NUTA BULLETIN
FORTNIGHTLY JOURNAL OF NAGPUR UNIVERSITY TEACHER'S ASSOCIATION
Regd. No. ATI 263 *Licensed to post without prepayment No. ATI 10
Year: 22 15th February 1997 No.1

# PAY SCALES PROPOSED BY FIFTH PAY COMMISSION

| Sr.No. | Existing standard scales of pay Rs. | Grades | Revised Standard Scales of Pay Rs. | Span in Years |
|---|---|---|---|---|
| 1. | 750-12-870-14-940 | S-1 | 2440-40-3200 | 19 |
| 2. | 775-12-871-14-1025 | S-2 | 2550-45-3540 | 22 |
| 3. | 800-15-1010-20-1150 | S-3 | 2650-50-4000 | 27 |
| 4. | 825-15-900-20-1200 | S-4 | 2750-55-4400 | 30 |
| 5. | 950-20-1150-25-1400<br>950-20-1150-25-1500<br>1150-25-1500 | S-5 | 3050-70-4590 | 22 |
| 6. | 975-25-1150-30-1540<br>975-25-1150-30-1660 | S-6 | 3200-85-4900 | 20 |
| 7. | 1200-30-1440-30-1800<br>1200-30-1560-40-2040<br>1320-30-1560-40-2040 | S-7 | 4000-100-6000 | 20 |
| 8, | 1350-30-1440-40-1800-50-2200<br>1400-40-1800-50-2300 | S-8 | 4500-125-7000 | 20 |
| 9. | 1400-40-1600-50-2300-60-2600<br>1600-50-2300-60-2660 | S-9 | 5000-150-8000 | 20 |
| 10. | 1640-60-2600-75-2900 | S-10 | 5500-175-9000 | 20 |
| 11. | 2000-60 ~ 2120 | S-11 | 6500-200-6900 | 02 |
| 12. | 2000-60-2300-75-3200<br>2000-60-2300-75-3200-100-3500 | S-12 | 6500-200-10500 | 20 |
| 13. | 2375-75-3200-100-3500<br>2375-75-3200-100-3500-125-3750 | *S-13* | 7000-225-11500 | 20 |
| | 2500-4000 (proposed new pre-revised scale) | S-14 | 7500-250-12000 | 18 |
| **14.** | **2200-75-2800-100-4000**<br>2300-100-2800 | **S-15** | **8000-275-13500** | **20** |
| 15. | 26301- fixed | S-16 | 9000/- fixed | |
| 16. | 2630-75-2 780 | S-17 | 9000-275-9550 | 02 |
| 17. | 31 50-100-3350 | S-18 | 10325-325-10975 | 02 |
| 18. | 3000-125-3625<br>3000-100-3500-125-4500<br>**3000-100-3500-125-5000** | S-19 | **10000-325-15200** | **16** |
| 19. | 3200-100-3700-125-4700 | S-20 | 10650-325-15850 | 16 |
| 20. | 3700-150-4450 | S-21 | 12000-375-16500 | 12 |
| 21. | 3950-125-4700-150-5000 | S-22 | 12750-375-165(}0 | 10 |
| **22.** | **3700-125-4950-150-5700** | **S-23** | **12000-375-18000** | **16** |
| 23. | 4100-125-4850-150-5300<br>4500-150-5700 | S-24 | 14300-400-18300 | 10 |
| 24. | 4800-150-5700 | S-25 | 15100-400-18300 | 08 |
| 25. | 5100-150-.5700<br>5100-150-61 50<br>5100-150- 5700-200-6300 | S-26 | 16400-450-20000 | 08 |
| 26. | 5100-150-6 300-200-6700 | S-27 | 16400-450-20900 | 10 |
| **27.** | **4500-150-5700-200-7300** | **S-28** | **14300-450-22400** | **18** |
| 28. | 5900-200-6700<br>5900-200-7300 | S-29 | 18400-500-22400 | 08 |
| 29. | 7300-100-7600 | S-30 | 22400-525-24500 | 04 |
| 30. | 7300-200-7500-250-8000 | S-31 | 22400-600-26000 | 06 |
| 31. | 7600/- fixed<br>7600-100-8000 | S-32 | 24050-650-26000 | 03 |
| 32. | 8000/- fixed | S-33 | 26000/- fixed | -- |
| 33. | 9000/- fixed | S-34 | 30000/- fixed | -- |

***NOTE:*** *- It may be clarified that while discussing the various pay scales, the Commission came to the conclusion that there was need for another payscale between Rs. 2000-3500-2375-35001 2375-3750 on the one hand and Rs. 2200-4000 or Rs. 3000-4500 on the other. As such, we coined a pre-revised payscale of Rs. 2500-4000 as a Group 'B' payscale, to act as an Intermediate stage. As we had already decided to raise the revised payscale corresponding to Rs. 2200-4000 to Rs. 8000-13500 (instead of Rs. 7000 etc. as it should have become if the broad multiplier of 3.25 were used), there was a gap of Rs. 1000. It should be clearly understood that the pre-revised scale of Rs. 2 500-4000 (as it corresponds to a revised scale of Rs. 7500-12000) is a lower scale than Rs. 2200-4000 (as it corresponds to a revised scale of Rs. 8000-1 3 500).*

मुद्रा
राष्ट्रकुल संसदीय मंडळ

# राष्ट्रकुल संसदीय मंडळ,
# महाराष्ट्र शाखा

## 'उत्कृष्ट संसदपटु'
### पुरस्कार सन - १९९५-९६

## सन्मानपत्र

श्री. भाऊराव तुळशीरामजी देशमुख, विधानपरिषद सदस्य हे गेली १५ वर्षाहून अधिक काळ संसदीय प्रणालीचा पाया मजबूत करण्यामध्ये एक अग्रेसर म्हणून ओळखले जातात. सन १९८० मध्ये त्यांनी जेव्हा विधानमंडळामध्ये प्रवेश केला तेव्हापासून त्यांनी आपली संसदीय प्रणाली अधिक भक्कम होण्यासाठी भरीव योगदान दिले आहे. सामाजिक जाणिवेची निसर्गदत्त देणगी आणि उत्कृष्ट धैर्य त्यांना लाभल्याने त्यांनी नेहमीच राज्यातील जनतेच्या भल्यासाठी निक्षून आणि अत्यंत निर्धाराने आपली बाजू मांडली. त्यांनी अभ्यास व तपश्चर्येव्दारा वाटचाल केली आणि अशा तऱ्हेने त्यांनी लोकांच्या समस्यांचा आवाका आणि व्याप्ती पूर्णपणे समजून घेतली. त्यांची उपजत बुद्धिमत्ता आणि कार्यकुशलता यामुळे त्यांचे विशेष व्यक्तिमत्व बनले आहे. विविध विषयांचे अर्थपूर्ण व सुलभ विशदीकरण करण्याच्या त्यांच्या हातोटीमुळे महाराष्ट्र विधानमंडळाच्या माध्यमातून संसदीय प्रणाली सजीव आणि समृद्ध होण्यास मदत झाली आहे. विधिमंडळाचे नियम आणि कार्यपद्धती यावर असलेली त्यांची उत्तम पकड आणि संसदीय सभ्याचार व प्रतिष्ठा तसेच समित्यांच्या कामांची उत्तम जाण याकरिता ' **उत्कृष्ट संसदपटु** ' हा पुरस्कार त्यांना देण्यात राष्ट्रकुल संसदीय मंडळाच्या महाराष्ट्र शाखेला अतिशय आनंद होत आहे.

**दत्ताजी नलावडे**
अध्यक्ष
महाराष्ट्र विधानसभा
व
सह अध्यक्ष, राष्ट्रकुल संसदीय मंडळ
महाराष्ट्र शाखा

**जयंतराव टिळक**
सभापती
महाराष्ट्र विधानपरिषद
व
सह अध्यक्ष, राष्ट्रकुल संसदीय मंडळ
महाराष्ट्र शाखा

# श्री.बी.टी.देशमुख व श्री.दि.बा.पाटील यांना "उत्कृष्ट संसदपटू" व "उत्कृष्ट भाषण" पुरस्कार मिळाल्याबाबत अभिनंदनाचा प्रस्ताव.

*महाराष्ट्र विधान परिषद :* *: तिसरे अधिवेशन १९९६*

***बुधवार, दिनांक १८.१२.१९९६***

*श्री.बी.टी.देशमुख व श्री.दि.बा.पाटील यांना ''उत्कृष्ट संसदपटू'' व ''उत्कृष्ट भाषण'' पुरस्कार मिळाल्याबाबत अभिनंदनाचा प्रस्ताव.*

**श्रीमती संजीवनी रायकर (मुंबई शिक्षक)** : अध्यक्ष महोदय, संसदीय राष्ट्रकुल परिषदेने जो अभिनव पायंडा पाडला आहे, त्या बद्दल मी त्यांचे अभिनंदन करते. अभिनंदन करण्याची प्रथा संसदेत पुर्वीपासून आहे. पण ह्या वर्षापासून विधान सभेनेही उत्कृष्ट संसदपटू व उत्कृष्ट भाषण पुरस्कार मिळणाऱ्यांचा सन्मान करण्याचे ठरवून सन्मान केला, त्याबद्दल मी अभिनंदन करते.

अध्यक्ष महोदय, **श्री.बी.टी.देशमुख हे शिक्षक आहेत, ही एक शिक्षक जमातीला अत्यंत अभिमानाची गोष्ट आहे.** अध्यक्ष महाराज, आपणच त्यांच्याबद्दल गौरवोद्‌गार काढलेले आहेत, ते मी पुन्हा याठिकाणी उधृत करू इच्छिते की, जर एखाद्या वेळेस विधिमंडळाचे सबंध कार्यवृत्त जळून गेले किंवा नाहीसे झाले तरी सुद्धा असे काही लोकप्रतिनिधी आहेत की ज्यांच्याकडे सगळी कागदपत्रे मिळतील आणि सबंध संसदीय मंडळाची पुन्हा उभारणी होऊ शकेल त्यातील सन्माननीय सदस्य बी.टी.देशमुख हे एक आहेत. बाकीचे कोणी सन्माननीय सदस्य असतील तर मला माहीत नाही. मी या सभागृहामध्ये निवडून आल्यानंतर पाहिले आहे की, शिक्षकांच्या प्रश्नाबाबत, विदर्भाच्या प्रश्नाबाबत किंवा इतर प्रश्नाबाबत आग्रही भूमिका घेऊन जे मुद्दे सादर करतात, त्यांची मांडणी करतात ती खरोखर लक्षणीय आहे आणि त्यांनी कॉम्प्युटरवर सर्व माहिती गोळा केली आहे आणि आम्हाला सर्वाना कॉम्प्युटर शिकविण्याचेही त्यांनी मान्य केलेले आहे. आता ते शिकण्याचा योग कधी येतो ते पाहू. सन्माननीय सदस्य श्री.बी.टी.देशमुख यांचा **उत्कृष्ट संसदपटू** म्हणून जो सन्मान झाला, त्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करते.

अध्यक्ष महाराज, सन्माननीय सदस्य श्री.दि.बा.पाटील यांच्याविषयी सांगावयाचे तर ते वकील असल्यामुळे अत्यंत मुद्देसुदपणे, व्यवस्थितपणे आपल्या मुद्यांचे प्रतिपादन करतातच पण ते शेतकरी कामगार पक्षाचे सन्माननीय सदस्य असल्यामुळे आक्रस्ताळेपणाने बोलतील, मोठ्या आवाजामध्ये बोलतील, असे वाटत होते पण तसे न करता ते आपले मुद्दे अतिशय शांतपणे मांडत असतात. तसेच ते कधीही तत्त्वाशी तडजोड करीत नाहीत, त्यांचा आदर्श आमच्या पुढे निश्चितपणे आहे. त्यांचा उत्कृष्ट वक्ता म्हणून गौरव करण्यात आला आहे खरे म्हणजे दोन्ही पुरस्कार त्यांना देण्यामध्ये हरकत नव्हती एवढी त्यांची ताकद आहे. त्यांचा **उत्कृष्ट वक्ता** म्हणून जो सन्मान करण्यात आला आहे, त्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करते.

अध्यक्ष महाराज, विधान सभेतील सन्माननीय सदस्य सर्वश्री. आर.आर.पाटील व रायभान जाधव यांचाही सन्मान करण्यात आला आहे. त्यांचा आणि आमचा फारसा संबंध येत नसल्यामुळे वृत्तपत्राच्या माध्यमातून किंवा विधानसभेतील काही सदस्यांच्याव्दारा आम्हाला त्यांची जी माहिती समजते, त्यावरून ते देखील अतिशय चांगले संसदपटू आणि **उत्कृष्ट वक्ते** आहेत. त्यांनाही जो सन्मान देण्यात आला आहे, त्याबद्दल मी त्या दोघांचेही अभिनंदन करते. धन्यवाद.

**श्री.प्रमोद नवलकर (सांस्कृतिक कार्य मंत्री)** : अध्यक्ष महाराज, सन्माननीय सदस्या श्रीमती संजीवनी रायकर यांनी जो अभिनंदनाचा प्रस्ताव याठिकाणी मांडलेला आहे, त्याला अतिशय मनापासून आणि आनंदाने अनुमोदन देण्यासाठी मी उभा आहे. आपल्या ज्या दोन सहकाऱ्यांचा गौरव झालेला आहे, तो गौरव त्या दोघांचाच नसून संपूर्ण सभागृहाचा आहे म्हणून त्या आनंदामध्ये सर्वजण सहभागी होऊ इच्छितात. अध्यक्ष महाराज, आपल्या मार्गदर्शनाखाली या सभागृहामध्ये जे कामकाज चालते त्या कामकाजाला एक वेगळे वळण असते, शिस्त असते आणि कधीही कामकाजाच्या बाबतीत प्रक्षोभ घडून अतिरेक होणार नाही याचे मार्गदर्शन आम्हाला आपल्यामार्फत मिळत असल्यामुळे या सदनातील कुणाचाही गौरव झाला तर तो प्रत्यक्षपणे आपलाच गौरव आहे असे मी मानतो. या सभागृहातील ज्या दोन सन्माननीय सदस्यांचा गौरव झाला आहे त्याबद्दल कुणाचेही मतभेद असतील असे मला वाटत नाही. त्यांचा आदर्श आमदार म्हणून गौरव झाला आहे. **सन्माननीय सदस्य श्री.बी.टी.देशमुख यांच्या बाबतीत मी असे म्हणेन की, सभागृहामध्ये आल्यापासून त्यांच्याकडून माझ्यासारख्यांना खूप काही शिकण्यासारखे आहे. त्यांचा अभ्यास विशेषतः जुनी कात्रणे काढून त्यांचा अभ्यास करणे आणि सत्ताधारी पक्षाला आणि मंत्री**

## "रजा प्रवास सवलत" लागू करतांना सर्व स्तरावरील शिक्षकांना त्यापासून वंचित ठेवण्याबाबत

*महाराष्ट्र विधानपरिषद : : दुसरे अधिवेशन १९९५*

*बुधवार, दिनांक ९ ऑगस्ट १९९५*

(८) १३७२ सर्वश्री.**पी.जी.दस्तुरकर, श्री.बी.टी.देशमुख, व्ही.यु.डायगव्हाणे,जयवंत ठाकरे, सुरेश पाटील** : सन्माननीय मुख्यमंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

१. २३ ऑक्टोबर १९६३ च्या शासननिर्णयाने लागू केलेली "स्वग्राम रजा प्रवास सवलत" शासकीय कर्मचाऱ्याबरोबर सर्व स्तरावरील (माध्यमिक, उच्च माध्यमिक, महाविद्यालयीन व विद्यापीठीय) शिक्षकांना लागू होती, मात्र स्वग्राम रजा प्रवास सवलतीला विकल्प म्हणून २८ मार्च १९९५ च्या शासन निर्णयाने लागू करण्यात आलेल्या "रजा प्रवास सवलतीच्या" सुविधेपासून सर्व स्तरावरील शिक्षकांना वंचित ठेवण्यात आले आहे हे खरे आहे काय?

२. खरे असल्यास असा भेदभाव करण्याचे कारण काय?

३. हा भेदभाव दूर करण्यासाठी शासनाने काय उपाययोजना केलेली आहे वा करण्याचे योजीले आहे?

**श्री.सुधिर जोशी** (शालेय शिक्षण) : (१) शासन निर्णय वित्त विभाग दि. २३.१०.१९६३ अन्वये फक्त शासकीय कर्मचाऱ्यांना दोन वर्षातून एकदा स्वग्रामी जाण्यासाठी रजा प्रवास सवलत लागू करण्यात आली आहे. यामध्ये खाजगी शाळांतील तसेच महाविद्यालयातील कर्मचाऱ्यांचा समावेश नसल्याने शासन निर्णय, वित्त विभाग, दि. २८.३.१९९५ अन्वये शासकीय कर्मचाऱ्यांना चार वर्षातून एकदा महाराष्टात कोठेहि जाण्यासाठी लागू केलेल्या रजाप्रवास सवलतीच्या आदेशामध्ये खाजगी शाळांतील तसेच महाविद्यालयातील कर्मचाऱ्यांचा समावेश करण्यात आला नाही हे खरे आहे.

२) प्रश्न उद्‌भवत नाही.

३) अ) उपरोक्त रजा प्रवास सवलत अकृषी विद्यापीठे व संलग्नीत महाविद्यायातील कर्मचाऱ्यांना लागू करण्याची बाब तपासण्यात येत आहे.

ब) राज्यातील खाजगी माध्यमिक शाळांतील कर्मचाऱ्यांना ही रजाप्रवास सवलत लागू करण्याचा शासनाने निर्णय घेतला असून याबाबतचे आदेश लवकरच निर्गमित करण्यात येतील.

## सर्व स्तरावरील शिक्षकांना "रजा प्रवास सवलत" लागू करतांना भेदभावपूर्ण दिलेली वागणूक

*महाराष्ट्र विधानपरिषद : : तिसरे अधिवेशन १९९५*

*बुधवार, दिनांक १३ डिसेंबर १९९५*

(१५) ४५२८ **सर्वश्री.बी.टी.देशमुख, व्ही.यु.डायगव्हाणे, पी.जी.दस्तुरकर, जयवंत ठाकरे, सुरेश पाटील** : तारांकित प्रश्न क्रमांक १३७२ ला दिनांक ९ ऑगस्ट १९९५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय मुख्यमंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

१. खाजगी माध्यमिक शाळातील कर्मचाऱ्यांना रजाप्रवास सवलत लागु करण्याचा जो निर्णय शासनाने घेतला आहे त्याबाबतचे आदेश निर्गमित करण्यात आले आहेत काय व केंव्हा?

२. तसेच महाविद्यालयीन व विद्यापीठीय शिक्षक व कर्मचाऱ्यांना रजा प्रवास सवलत लागू करण्याच्या विचाराधीन बाबीवरील शासनाचा विचार पूर्ण झालेला आहे काय?

३. असल्यास याबाबत शासनाने घेतलेल्या निर्णयाचे स्वरुप काय आहे ?

४. अद्यापहि विचार पूर्ण झालेला नसल्यास याबाबत होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर जोशी** : १) नाही.

(२). नाही.

३) व ४) चार वर्षातून एकदा महाराष्ट्रात कोठेही जाण्यासाठी रजाप्रवास सवलत अकृषी विद्यापीठे व संलग्नीत महाविद्यालयातील कर्मचाऱ्यांना तसेच खाजगी माध्यमिक शाळेतील कर्मचाऱ्यांना लागू करण्याच्या संदर्भात अधिक तपासणी करण्यात येत आहे.

**महोदयांना नामोहरम करणे ही सोपी गोष्ट नाही. एखाद्या खात्याच्या संबंधात त्यांनी प्रश्न विचारलेले असतील तर मंत्री त्यांना सकाळी फोन करून विचारतात की, तुम्ही कोणकोणते प्रश्न विचारणार आहात म्हणजे आम्ही त्या प्रमाणे चांगली तयारी करून येतो.** अशा प्रकारे समतोल विचारांचे, अभ्यासू, व्यासंगी आणि या सभागृहाला अभिमान वाटावे असे त्यांचे या ठिकाणचे कामकाज पाहिल्यानंतर केवळ आदर्श म्हणून नव्हेतर **विधिमंडळ भूषण म्हणूनही त्यांचा गौरव केला तरी ते यथायोग्य होईल असे मला वाटते.** सन्माननीय सदस्य श्री.बी.टी.देशमुख केवळ कामकाजाच्या वेळीच चिडतात, एरवी मी त्यांना चिडलेले पाहिलेले नाही. अतिशय गोड माणूस म्हणून त्यांच्याविषयी आपुलकी वाटत असते.

अध्यक्ष महाराज, दुसरे सन्माननीय सदस्य श्री.दि.बा.पाटील हे विरोधी पक्षामध्ये आहेत. ते नेहमी हसतमुख असतात. आम्ही १९७२ पासून त्यांचे कामकाज पहात आहोत. आणि त्यांच्याकडून बरेच काही शिकत आहोत. आम्ही त्यांच्याकडून काही शिकत असतांना ते आमच्याकडून काही शिकत नाहीत अशी आमची त्यांच्याबाबतीत तक्रार आहे. स्वतंत्र प्रवृत्तीचा, आवेगामध्ये कधीही वाहून जावयाचे नाही, स्वतःचा संयम पाळावयाचा आणि अध्यक्ष महाराज, ज्या ज्या वेळेस या सभागृहामध्ये विरोधी पक्षाचे सदस्य आपल्या दिशेने येतात, त्यावेळेला देखील त्यांनी एक मर्यादा आखलेली असते. त्याच्या पलीकडे माननीय सदस्य श्री.दि.बा.पाटील कधीच जाणार नाहीत असे समजायला हरकत नाही. याठिकाणी अतिशय शांत स्वभावाचे असा माननीय सदस्या श्रीमती रायकर यांनी त्यांचा उल्लेख केला ते तेवढे काही खरे नाही. माननीय सदस्य श्री.दि.बा.पाटील एकदा चिडले तर त्यांना कोणाला आवरता येत नाही. म्हणून ते चिडले तर आम्ही गप्प बसायचे असे ठरविले आहे. मग ते हळूहळू शांत होतात. अनेक वेळेला ते आमचे बोचकारे काढतात, परंतु वडीलकीच्या नात्याने असेल अथवा अन्य काही असेल सदैव आम्ही त्यांचा मान ठेवला आहे. त्यांनी या सभागृहामध्ये आपला ठसा उमटवून आमच्या समोर एक आदर्श घालून दिलेला आहे.

सभापती महोदय, याच निमित्ताने आमच्या मनात एक शल्य आहे ते बोलून दाखवितो. माझ्या समोर बसलेल्या माननीय सदस्यांना सभागृहाच्या कामकाजामध्ये भाग घेतांना आपले सर्व कौशल्य दाखविता येते, कौशल्य दाखविण्याची संधी मिळते. तेवढी संधी माझ्या मागे बसणाऱ्या सन्माननीय सदस्यांना मिळू शकत नाही. तेव्हा माझी अशी सूचना आहे की, त्यातील एक तरी पुरस्कार सत्ताधारी पक्षाच्या सदस्यांसाठी राखून ठेवला तर याही बाजूच्या सन्माननीय सदस्यांचे कौतुक होवू शकेल एवढीच विनंती करून मी माझे भाषण संपवितो.

**श्री. अरुण मेहता (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांव्दारा निर्वाचित) :** सभापती महोदय, माननीय सदस्या श्रीमती संजीवनी रायकर यांनी जो अभिनंदनाचा ठराव मांडला आहे, तो कौतुकाचा भाग आहे. या सदनातील उत्तम सदस्यांचे ज्यावेळेस सर्वांच्यासमोर कौतुक होते, त्यावेळेस या सदनाची शान वाढते. उंची वाढते. या सदनातील सदस्यांना असे पुरस्कार देण्याचा जो विचार राष्ट्रकुल संसदीय मंडळाने केला, त्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो. यामधून चांगले संसदपटू किंवा एखाद्या विषयावर उत्तम वक्तव्य करणारे जे सदस्य आहेत ते अधिक प्रोत्साहीत होतील, याविषयी माझ्या मनात शंका नाही. माननीय मंत्री महोदय श्री. प्रमोद नवलकर यांनी इकडच्या बाजूने आणि तिकडच्या बाजूने असा मुद्दा मांडला, परंतु चांगल्या विषयावर चांगले भाषण केले तर सत्ताधारी पक्षाच्या सदस्यांचीही या पुरस्कारासाठी निवड होवू शकेल. त्यामुळे याबाबतीत त्यांनी जो विचार मांडला आहे त्याचा जरूर विचार करावा. पण जास्त पारितोषिके वाढविली तर त्याचे महत्त्व कमी होते. **म्हणून या सदनात उत्कृष्ट संसदपटू म्हणून प्रा.बी.टी.देशमुख यांना सन्मान दिला गेला आहे, हे अत्यंत उचित आहे, योग्य आहे आणि सार्थकी लागल्याचे आहे असे मला वाटते.**

सभापती महोदय, माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख यांच्याविषयी सर्वांना चांगला अनुभव आहे. ते एखाद्या प्रश्नाचा मागोवा करतात, म्हणजे त्या मंत्र्यांने किती आश्वासने आजतागायत दिली. कोणत्या तारखेला कोणत्या अधिवेशनात दिली, त्याचा प्रश्न क्रमांक काय होता? याच्यापासून सारा इतिहास ते सभागृहासमोर उभा करतात आणि मग तो प्रश्न सोडवून घेण्यासाठी प्रयत्नशील राहतात. अमरावतीच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न हा माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख यांनी ज्या स्वरूपात लावून धरला, मला असे वाटते की, त्यांच्याऐवजी दुसरे कोणीही असते तरी १० टक्क्याची सूट मिळाली नसती. परंतु माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख यांनी वेगवेगळ्या आयुधांचा वापर करून प्रश्न लावून धरला आणि सोडवून घेतला. त्याचबरोबर मेडीकल प्रवेशांच्या बाबतीत लोकसंख्येच्या आधारावर समन्यायी जागांचे वाटप हा प्रश्न सोडविण्यासाठी त्यांनी धरलेला आग्रह आपणा सर्वांना माहीत आहे. तसेच अमरावतीचा बायपास असेल, अकोला शहराची पुररेषा असेल, हे सर्व प्रश्न सोडवितांना प्रा.बी.टी.देशमुख यांना या सदनाने पाहिले आहे. **मा. बी.टी.देशमुख यांचे नाव ऐकल्याबरोबर सगळ्यांना एकदम मान्य झाले की, होय, आपल्या मनातील असलेल्या माणसाला दाद मिळाली म्हणून मी त्यांचे अभिनंदन करतो. योग्य माणसाला योग्य वेळी पारितोषिक मिळाले म्हणून मनापासून त्यांचे अभिनंदन करतो.**

सभापती महोदय, उत्तम वक्ता म्हणून पारितोषिक मिळालेले दुसरे माननीय सदस्य श्री.दि.बा.पाटील हे धगधगती मशाल आहेत. त्यांना शांत म्हणणे म्हणजे त्यांना गुदमरल्यासारखे झाले असेल....

**सभापती :** शांतपणे ते आपला राग व्यक्त करतात. And it is a part of dialecting skill.

**श्री. अरूण मेहता :** वयावरून, अनुभवावरून आलेली परिपक्वता आहे. सन्माननीय सदस्य श्री.दि.बा.पाटील हे या ठिकाणी जेवढे आक्रमक असतात त्यापेक्षा बाहेर एखाद्या मुद्यावर किती आक्रमक होऊ शकतात, हे ज्यांनी त्यांची आंदोलने पाहिलेली आहेत त्यांनी अनुभवलेले आहे. सन्माननीय सदस्य श्री.दि.बा.पाटील नसते तर उरणच्या शेतकऱ्यांना न्याय मिळाला असता काय? अशी शंका येते असे म्हटले तर ते वावगे होणार नाही. यानंतर महाराष्ट्रातील ज्या शेतकऱ्यांच्या जमिनी शासनाने घेतल्या त्या शेतकऱ्यांना

---

### महाविद्यालयीन व विद्यापीठीय शिक्षकांना रजा प्रवास सवलत लागू करणे

*महाराष्ट्र विधानपरिषद : : दुसरे अधिवेशन १९९६*
*मंगळवार, दिनांक ६ ऑगस्ट १९९६*
*रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकीत प्रश्नोत्तराच्या दुसऱ्या यादीतील प्रश्न क्र. (९) ७६३३*

(९) ७६३३ (१४.३.९६) **सर्वश्री.बी.टी.देशमुख, व्ही.यु.डायगव्हाणे, पी.जी.दस्तुरकर, जयवंत ठाकरे, सुरेश पाटील :** तारांकीत प्रश्न क्रमांक ४५२८ ला दिनांक १३ डिसेंबर १९९५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय उच्च व तंत्रशिक्षण मंत्री पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-

(१) महाविद्यालयीन व विद्यापीठीय शिक्षक व कर्मचाऱ्यांना रजा प्रवास सवलत लागू करण्याच्या विचाराधीन बाबीवरील शासनाचा विचार पूर्ण झालेला आहे काय;

(२) विचार पूर्ण झालेला असल्यास याबाबत शासनाने घेतलेल्या निर्णयाचे स्वरूप काय आहे;

(३) अद्यापही विचार पूर्ण झालेला नसल्यास याबाबत होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.दत्ता राणे** (९.५.९६) : (१) नाही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) ही बाब अद्यापही शासनाच्या विचाराधीन आहे.

---

### महाविद्यालयीन व विद्यापिठीय शिक्षकांना रजा प्रवास सवलत लागू करणे

*महाराष्ट्र विधानपरिषद : : तिसरे अधिवेशन १९९६*
*बुधवार, दिनांक ११ डिसेंबर १९९६*

(२९) ११९१३ **सर्वश्री.बी.टी.देशमुख, व्ही.यु.डायगव्हाणे, पी.जी.दस्तुरकर, जयवंत ठाकरे, सुरेश पाटील :** दिनांक ६ ऑगस्ट १९९६ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकीत प्रश्नोत्तराच्या दुसऱ्या यादीतील प्रश्न क्रमांक ७६३३ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय उच्च व तंत्रशिक्षणमंत्री पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-

१. महाविद्यालयीन व विद्यापिठीय शिक्षक व कर्मचाऱ्यांना रजा प्रवास सवलत लागू करण्याच्या विचाराधीन बाबीवरील शासनाचा विचार पूर्ण झालेला आहे काय?

२. विचार पूर्ण झालेला असल्यास याबाबत शासनाने घेतलेल्या निर्णयाचे स्वरुप काय आहे ?

३. अद्यापहि विचार पूर्ण झालेला नसल्यास याबाबत होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.नारायण राणे :** (१) होय

(२) शासकीय सेवकांप्रमाणे विद्यापीठे व संलग्नित अशासकीय अनुदानित माहविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना चार वर्षातून एकदा महाराष्ट्रात कोठेही जाण्यास रजा प्रवास सवलतीचा लाभ देण्याबाबतचे आदेश शासन निर्णय, क्रमांक एनजीसी-१२९५/५७८१७/प्रकरण क्रमांक ३१०९ विशि-५ दि. २८.११.९६ अन्वये निर्गमित करण्यात आले आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

न्याय मिळालेला आहे. त्यामुळे महाराष्ट्रातील शेतकरी, कास्तकार त्यांना कधीही विसरणार नाही. त्यांनी मंडल आयोगाच्या संदर्भात या सभागृहात आणि बाहेरही पोटतिडकिने प्रश्न मांडलेले आहेत हे आपण पाहिलेले आहे. सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.दि.बा.पाटील साहेब हे एका बिलावर अभ्यासपूर्ण असे बोलले त्यामुळे ते बील शासनाला राखून ठेवावे लागले. ते कोणते बील होते हे आता मला आठवत नाही. या ठिकाणी शासनातर्फे कोणतेही बील चर्चेसाठी येवो त्यांनी आपले म्हणणे अभ्यासपूर्ण अशारीतीने मांडलेले आहे. शासनावर आर्थिक बोजा येईल अशाप्रकारचे बिल असेल तर त्यामुळे आवर्ती आणि अनावर्ती असा किती खर्च येणार आहे याची माहिती जाणून घेण्याचा प्रयत्न त्यांच्याकडून केला जातो. ते लोकसभेमध्ये सदस्य असतांना त्यांनी चांगल्याप्रकारचा अभ्यास केल्यामुळे पार्लमेंटमध्ये प्रोसिजर काय आहे याबाबत त्यांनी येथे सांगून पीठासीन अधिकाऱ्यांच्या त्यांनी नजरेस आणून दिले की, आर्थिक बोजा यामुळे किती पडेल याबाबतचे बीलासोबत स्टेटमेंट नसेल तर हे बील सभागृहापुढे ठेवता येणार नाही. त्याप्रमाणे आपण निर्णय केलेला होता. म्हणून खास करून विधान परिषदेचे महत्त्व काय आहे हे आपल्याला दिसून येईल. विधानसभेमध्ये तितकासा वेळ मिळत नाही, ते बिल येथे आल्यानंतर त्यावर सविस्तर चर्चा करण्यास वेळ मिळतो. वैधानिक बाबीमध्ये काही त्रुटी असतील तर त्या त्रुटी दाखविण्याच्याबाबतीत जागरुकता ठेवण्याचे काम सन्माननीय सदस्य श्री.दि.बा.पाटील यांनी सातत्याने केलेले आहे. मला माहीत आहे की सन्माननीय सदस्य श्री.दि.बा.पाटील यांच्या मनामध्ये काही पक्के आडाखे आहेत. त्यांच्या त्या विचारांना कोणी छेद देण्याचा प्रयत्न केला तर ते उसळून उभे राहतात. पूर्वी होता त्याच अभिनिवेशाने आपण संसदपटू म्हणून त्यांची वक्तव्ये एकत्रित पाहिलेली आहेत. सन्माननीय सदस्य श्री.दि.बा.पाटील यांचा या सदनातही सत्कार केला त्याबद्दल आम्हाला मनापासून अतिशय आनंद होत आहेत. हे दोनही सदस्य सर्वांच्याबरोबर सातत्याने राहिले. त्यांची आम्हास सातत्याने प्रेरणा मिळत राहो. अशी सदिच्छा व्यक्त करून माझे दोन शब्द संपवितो.

**श्रीमती नीला देसाई (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित) :** सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती संजीवनी रायकर यांनी या ठिकाणी जो अभिनंदनाचा ठराव मांडलेला आहे त्याला पाठिंबा देण्यासाठी मी उभी आहे.

सर्वप्रथम राष्ट्रकुल संसदीय मंडळाचे चेअरमन, सभापती महोदय आणि विधानसभेचे अध्यक्ष श्री.दत्ताजी नलावडे साहेब यांना धन्यवाद देते. या सदनामध्ये सन्माननीय सदस्या श्रीमती संजीवनी रायकर यांना सन्माननीय सदस्य श्री.बी.टी.देशमुख आणि सन्माननीय सदस्य श्री.दि.बा.पाटील यांना संसदपटू म्हणून राष्ट्रकुल संसदीय मंडळातर्फे पारितोषिक दिल्याबद्दल अभिनंदनाचा प्रस्ताव मांडण्याची परवानगी दिली, त्याबद्दल मी आपल्याला धन्यवाद देते. आदरणीय सन्माननीय सदस्य श्री. दि.बा.पाटील आणि आदरणीय सन्माननीय सदस्य श्री.बी.टी.देशमुख यांचे कार्य मी नवनिर्वाचित सदस्या म्हणून येथे आल्यानंतर जवळून पहात आलेली आहे. विधीमंडळाच्याबाबतीत आमच्या मनामध्ये ज्या काही गोष्टी होत्या त्यामध्ये हे विधिमंडळ लोकशाहीचे मंदिर आहे, येथे आलेले लोकप्रतिनिधी हे पुजारी आहेत, हे पुजारी खऱ्याअर्थाने कशी पुजा करतात हे मला प्रत्यक्ष पहाण्याची संधी मिळालेली आहे. येथील काम पाहून कृतकृत्य झाले. वेळोवेळी मी विधिमंडळातील कामकाजाच्या दृष्टीने, वैधानिक आयुधे कशी वापरली जातात, या विधिमंडळात कामकाज कशाप्रकारे केले पाहिजे यादृष्टीने त्यांच्याकडे जाऊन माहिती घेण्याचा प्रयत्न करते. अनेक वेळा सदनामध्ये एखाद्या गोष्टीचा उद्रेक होतो. खास करून विरोधी पक्ष सदस्यांकडून अशा वेळी मर्यादांचे उल्लंघन केले जाते. परंतु या दोन व्यक्तींना मी कधीही सभागृहाच्या मर्यादांचे उल्लंघन करतांना पाहिलेले नाही. हे सांगतांना मला अतिशय अभिमान वाटतो. प्रथम मी मा. सदस्य श्री.दि.बा.पाटील यांच्या बाबतीत बोलणार आहे त्यांनी आतापर्यंत आपल्या भागातील प्रश्न मांडतांना ते अतिशय तळमळीने, पोटतिडकीने मांडले आणि धसास देखील लावले. त्यांची ही तळमळ पाहिली की, आपल्याला त्यांच्याकडून अद्याप खूप शिकायचे आहे याची जाणीव होते. मला त्यांच्याकडून बरेच काही शिकायला मिळालेले आहे. मा. सदस्य श्री.दि.बा.पाटील हे शेतकऱ्यांचे आदर्श लोकप्रतिनिधी आहेत. शेतकऱ्यांना आतापर्यंत बरेच जे काही मिळाले त्यामध्ये मा. सदस्य श्री. दि.बा.पाटील यांचा महत्त्वाचा वाटा आहे, ही बाब गौरवाची आहे.

मा. सदस्य श्री.बी.टी.देशमुख यांच्याशी माझा अगदी जवळून संबंध आलेला आहे. गेली दोन वर्षे मी आश्वासन समितीची सदस्या म्हणून काम करीत आहे. आमच्या समितीचे अध्यक्ष मा. सदस्य श्री. मेहता हे आहेत. मा. सदस्य श्री.बी.टी.देशमुख हे देखील त्या समितीमध्ये सदस्य म्हणून काम करतात.

*विद्यापीठे व संलग्नित अशासकीय कला, विज्ञान, वाणिज्य, शिक्षण शास्त्र, इत्यादी महाविद्यालये व प्रशासन संस्था, अनुदानित अशासकीय अभियांत्रिकी/तंत्रशास्त्र महाविद्यालये व तंत्रनिकेतन/तंत्र पदविका संस्था यातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना चार वर्षातून एकदा महाराष्ट्रात कोठेही जाण्यास रजा प्रवास सवलतीचा लाभ देण्याबाबत*

**महाराष्ट्र शासन : उच्च व तंत्रशिक्षण आणि सेवायोजन विभाग,**

*शासन निर्णय क्रमांक - एनजीसी १२९५/५७८१७/प्रकरण क्र. ३१०९ विशि-४*

*मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२.*

***दिनांक - २८ नोव्हेंबर, १९९६.***

***वाचा -*** *१) शासन निर्णय, शिक्षण व सेवायोजन व युवक सेवा विभाग क्रमांक एनजीसी-१२७९/१६३३९२(१०७)/३२/सेल, दिनांक १५ डिसेंबर १९७९ व समक्रमांकीत जोडपत्र दिनांक २१ मार्च १९८०.*

*२) शासन निर्णय, शिक्षण व सेवायोजन विभाग क्रमांक युएसजी-११८२/(७२०)/विशि-४, दिनांक ३० नोव्हेंबर, १९८२.*

*३) शासन निर्णय, शिक्षण व सेवायोजन विभाग क्र. पीईसी- १७८८/५०८३०/(३३३५-अ)तांशि-१ अ, दिनांक ७.३.१९८९.*

*४) शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक रप्रस/११९४/१८४/सेवा-५, दिनांक २८ मार्च, १९९५.*

*५) शिक्षण संचालक, (उच्च शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्रमांक एनजीसी- १९९५/६५९५/रजा/मवि-१. दिनांक १५ मे, १९९५.*

*६) संचालक तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र. ७/अनुदान/०३/१९९६/६२०, दिनांक १९.१.१९९६.*

**शासन निर्णय** :- प्रस्तावातील अनुक्रमांक १ व २ येथील शासन निर्णय, अन्वये विद्यापीठे व संलग्नित अशासकीय कला, विज्ञान, वाणिज्य, शिक्षण शास्त्र अनुदानित अशासकीय अभियांत्रिकी, तंत्रशास्त्र महाविद्यालये व तंत्र निकेतन/तंत्र पदविका संस्था इत्यादी मधून काम करणाऱ्या शिक्षकेतर व शिक्षक कर्मचाऱ्यांना स्वग्रामी जाण्यासाठी "रजा प्रवास सवलत" योजना मंजूर करण्यात आली आहे.

प्रस्तावातील अनुक्रमांक ४ येथील शासन निर्णय अन्वये राज्य शासन कर्मचाऱ्यांना चार वर्षातून एकदा महाराष्ट्रात कोठेही जाण्यास "रजा प्रवास सवलत योजना" मंजूर करण्यांत आली आहे. हे आदेश जसेच्या तसे विद्यापीठे व संलग्नित अशासकीय कला, विज्ञान, शिक्षणशास्त्र, अनुदानित अशासकीय अभियांत्रिकी/तंत्रशास्त्र महाविद्यालये व तंत्रनिकेतन/तंत्र पदविका संस्था इत्यादी महाविद्यालयांतील शिक्षकेतर व शिक्षक कर्मचाऱ्यांना लागू करण्यांत येत आहेत.

हा शासन निर्णय, वित्त विभागाच्या सहमतीने त्याचा अनौपचारिक संदर्भ क्रमांक १२२९/९६/सेवा-५, दिनांक २१ नोव्हेंबर, १९९६ अन्वये निर्गमित करण्यांत येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने

स्वा/-

उपसचिव, महाराष्ट्र शासन.

मंत्र्यांनी दिलेली आश्वासने धसास लावण्यासाठी जो अभ्यास, व्यासंग लागतो त्याचे मूर्तिमंत उदाहरण मा. बी.टी.देशमुख हे आहेत. आश्वासन पुर्तीसाठी खूप प्रयत्न करावे लागतात. खूप माहिती गोळा करावी लागते. ही माहिती संकलित करणे हे कठीण काम असते. हे सर्व काम ते लीलया करतात. **त्यांच्याजवळ संगणक यंत्र आहे. त्याचा उपयोग करून आपल्याला जी माहिती हवी असेल ती ते ताबडतोब काढून देतात. मी तर त्यांना नेहमीच गंमतीने म्हणते की, आपण म्हणजे एक चालता बोलता एनसायक्लोपीडीया आहात.** सदनातील कामकाजामध्ये भाग घेतांना त्यांची तळमळ आपण नेहमीच पहातो. मा. सदस्य श्री.मेहता यांनी सांगितल्याप्रमाणे बायपास रस्त्याचे काम असो अथवा विद्यापीठाचा प्रश्न असो, त्यांनी हे प्रश्न पोटतिडकीने येथे मांडून घसास लावलेले आहेत. तडीस नेले आहेत. सिद्धीस नेले आहेत. मा. मंत्री महोदयांना वैधानिक आयुधांचा वापर करून ते कैचीमध्ये पकडतात. केवळ आश्वासनच मिळवायचे नाहीतर त्याची पूर्ती कशी करून घ्यायची हे कोणीही त्यांच्याकडूनच शिकावे. ते अतिशय मृदू स्वभावाचे आहेत. इतर वेळी जास्त बोलत नाहीत परंतु या सदनामध्ये आपल्या विषयांवर बरेच बोलतात. कमी बोलून बरेच काही आपल्या पदरामध्ये कसे पाडून घ्यावे याबाबतीत आपल्याला त्यांच्याकडून शिकण्यासारखे आहे. अध्यक्ष महाराज, राष्ट्रकुल संसदीय शिबिर हे नागपूर अधिवेशनामध्ये दर वर्षी आयोजित केले जाते. राज्यातील राज्यशास्त्राचे विद्यार्थी तसेच आमच्यासारखे नवनिर्वाचित सदस्य यांच्यासाठी हे शिबिर अत्यंत मार्गदर्शक स्वरूपाचे असते. या वेळी या शिबिराचे आयोजन करण्याचे काम माझ्याकडे आणि माझे मित्र मा. सदस्य श्री. मोडक यांच्याकडे होते. या विधिमंडळाचे सचिव श्री. रमेश कांबळी यांनी आमच्यावर ही जबाबदारी सोपविलेली होती. आम्ही या शिबिराला सतत उपस्थित रहात होतो. अनेक वक्त्यांशी यामुळे माझा जवळून परिचय झाला. राज्यशास्त्राच्या विद्यार्थ्यांना ज्या प्रमाणे या शिबिरातून काही गोष्टी शिकायला मिळतात त्याप्रमाणे आम्हाला देखील बऱ्याचशा गोष्टी शिकायला मिळतात. परवाच या ठिकाणी चांगल्या गोष्टीसाठी पुरस्कार देऊन नवीन पिढीला मार्गदर्शक ठरेल असा सोहळा झाला. आपल्या सदनातील दोन सन्माननीय सदस्यांना हा पुरस्कार मिळाला. ज्या दिवशी संध्याकाळी पुरस्कार वितरण सोहळा होणार होता त्याच दिवशी सकाळी योगायोगाने मा. सदस्य श्री.बी.टी.देशमुख यांची ओळख राष्ट्रकुल संसदीय शिबिराला करून देण्याची जबाबदारी माझ्यावर आली होती. त्यावेळी त्यांची ओळख करून देत असतांना मी म्हटले होते की, आपल्याला आज असे सन्माननीय सदस्य वक्ते म्हणून लाभलेले आहेत की, त्यांना उत्कृष्ट संसदपटूचा पुरस्कार शोभेल. सकाळी मी ही इच्छा व्यक्त केली आणि संध्याकाळी त्यांना उत्कृष्ट संसदपटूचा पुरस्कार बहाल करण्यात आला. या बाबतचा आनंद मी या ठिकाणी सहर्ष व्यक्त करीत आहे. विधान सभेतील दोन मा. सदस्य श्री.आर.आर.पाटील व मा. सदस्य श्री. रायभान जाधव यांना देखील हा पुरस्कार मिळालेला आहे. त्यांची नावे आपण वेळोवेळी वर्तमानपत्रातून वाचत आलो आहोत. या सभागृहाच्या दोन सदस्यांना हा पुरस्कार मिळालेला आहे. त्यांचा हा पुरस्कार आमच्या समोर आदर्श आहे. त्यामुळे लोकशाहीचा कारभार चालवितांना आम्हाला याचा निश्चितपणे उपयोग होईल. तरी सन्मान मिळालेल्या दोन सदस्यांना या ठिकाणी मी मानाचा मुजरा करते. हे दोन्ही सदस्य या सदनाचे वैभव आहेत म्हणून मी त्यांना प्रणाम करते आणि त्यांना शुभेच्छा देवून माझे भाषण संपविते.

**श्री. व्यंकाप्पा पतकी (विधान सभेने निवडलेले)** : या सभागृहाच्या सन्माननीय सदस्या श्रीमती संजीवनी रायकर यांनी जो ठराव मांडला आहे त्याला पाठिंबा देण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे. पूर्वी राजा आणि राजेशाही होती आणि त्यातून लोकशाही अशी मॉडर्न स्टेटची कल्पना पुढे आली. हे मॉडर्न स्टेट जीवनाच्या सर्व अंगाना स्पर्श करणारे निर्णय घेते. असे निर्णय शासनाकडून घेतले जातात. त्याची अंमलबजावणी कशी होते, धोरण कशा पद्धतीने ठरविले जाते, याची छाननी विधिमंडळाकडून केली जाते. हे विधिमंडळ शासनावर आणि नोकरशाहीवर परिणामकारक असे सुनियंत्रण ठेवते. नोकरशाही दुबळी असावी, शासन दुबळे असावे असे मला या ठिकाणी म्हणावयाचे नाही. विधिमंडळाच्या माध्यमातून शासनाच्या अनेक निर्णयांची आणि धोरणांची छाननी होते. हे काम करीत असताना विधिमंडळाचे काम कसे आदर्श होऊ शकते याचा आदर्श सन्माननीय सदस्य श्री.दि.वा.पाटील आणि श्री.बी.टी.देशमुख यांनी घालून दिलेला आहे. तरी मला याठिकाणी अशी

## चार वर्षातून एकदा महाराष्ट्रात कोठेही जाण्यास रजा प्रवास सवलत

**महाराष्ट्र शासन : वित्त विभाग : शासन निर्णय क्र. रप्रस ११९४/१८४/सेवा-५**

***मंत्रालय, मुंबई-४०० ०३२, दिनांक : २८ मार्च १९९५***

**शासन निर्णय** : केंद्र शासनाने आपल्या कर्मचाऱ्यांना चार वर्षातून एकदा देशात कोठेही जाण्यास "रजा प्रवास सवलत" ही योजना मंजूर केलेली आहे. केंद्र शासनाच्या धर्तीवर राज्य शासकीय कर्मचाऱ्यांनाही अशाप्रकारची "चार वर्षातून एकदा राज्यात कोठेही जाण्यास रजा प्रवास सवलत" योजना लागू करण्याचा प्रश्न काही काळ शासनाच्या विचाराधीन होता. शासन आता असे आदेश देत आहे की, **राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना** देखील चार वर्षातून एकदा महाराष्ट्रात कोठेही जाण्यासाठीची रजा प्रवास सवलत ही योजना खाली दर्शविल्याप्रमाणे मंजूर केली जावी.

२. या प्रवास सवलतीला यानंतर **"रजा प्रवास सवलत"** व सध्याच्या दोन वर्षातून एकदा स्वग्रामी जाण्यासाठी अनुज्ञेय असणाऱ्या रजा प्रवास सवलतीला **"स्वग्राम रजा प्रवास सवलत"** असे संबोधिले जावे. ही रजा प्रवास सवलत महाराष्ट्र राज्याच्या भौगोलीक सीमेच्या आत अनुज्ञेय राहील. राज्यात कोठेही जाण्याची ही प्रवास सवलत असल्याने या रजा प्रवास सवलतीखाली प्रवास करावयाच्या अंतरासाठी किमान व कमाल अंतराची मर्यादा रहाणार नाही. परंतु या रजा प्रवास सवलतीचे ठिकाण घोषित करण्याची पूर्व अट राहील व मुख्यालय ते घोषित ठिकाण यासाठीचा प्रवास खर्च जवळच्या मार्गाने व प्रत्यक्ष तिकीट भाड्याच्या आधारावर अनुज्ञेय राहील.

३. या रजा प्रवास सवलतीसाठीच्या पहिल्या गट वर्षाची सुरूवात १९९३ पासून झाली आहे असे समजण्यात यावे. त्यामुळे ही गट वर्षे १९९३-९६, १९९७-२००० अशी असतील. या सवलतीचा फायदा घेतला गेल्यास संबंधित स्वग्राम रजा प्रवास सवलतीच्या गट वर्षाची स्वग्राम रजा प्रवास सवलत अनुज्ञेय होणार नाही. या प्रवास सवलतीच्या चार वर्षाच्या गट वर्षात दोन स्वग्राम रजा प्रवास सवलती किंवा एक रजा प्रवास सवलत व एक स्वग्राम रजा प्रवास सवलत अनुज्ञेय राहील.

४. जे शासकीय कर्मचारी शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक टीआरए ११६३/२७२६/५ दिनांक २३ ऑक्टोबर १९६३ च्या परिच्छेद-११ मधील सवलतीचा लाभ घेत असतील त्यांना अशी सवलत पुढे चालू ठेवावी किंवा या योजनेचा लाभ घ्यावा याबाबत विकल्प देता येईल.

५. या प्रवास सवलतीचा लाभ घेण्यासाठी प्रवास करण्याचे ठिकाण, अर्जाव्दारे लेखी घोषित करणे तसेच प्रवास सुरू करण्यापूर्वी सक्षम अधिकाऱ्यांची पूर्व परवानगी घेणे आवश्यक राहील.

६. स्वग्राम रजा प्रवास सवलतीसाठीच्या शासन निर्णय, वित्त विभाग क्र. टीआरए ११६३/२७२६/५ दिनांक २३ ऑक्टोबर १९६३ व त्यानंतर त्या संदर्भात निर्गमित करण्यात आलेल्या आदेशातील सर्व तरतूदी या रजा प्रवास सवलतीसाठी आवश्यक त्या फेरफारासह लागू रहातील.

७. शासकीय कर्मचाऱ्यांच्या बाबतीत या रजा प्रवास सवलतीवरील खर्च मागणी क्रमांक : जी-८-२०७०, इतर प्रशासनिक सेवा-८००, इतर खर्च (दोन) महागाई भत्ता, सुधारित वेतन घरभाडे भत्ता इत्यादिसाठी ठोक तरतूद (२०७०-०५२१) या शीर्षाखाली शासन ज्ञापन, वित्त विभाग, क्रमांक : आकनि ११९५/२३४/अर्थसंकल्प-७ दिनांक २८ मार्च १९९५ संगणक संकेतांक क्र. ८००० २३४-९ अन्वये मंजूर केलेल्या रु. ७.०० कोटी आकस्मिकता निधी अग्रिमातून करण्यात यावा. आहरण व संवितरण अधिकाऱ्यांनी सदर खर्च अग्रिमाच्या प्रतिपूर्तीनंतर शेवटी कोणत्या लेखाशीर्षाखाली खर्ची टाकावयाचा हे सूचित करावे. त्यानंतर रजा प्रवास सवलतीसाठीचा खर्च, स्वग्राम रजा प्रवास सवलतीचा खर्च ज्या प्रमुख लेखा शिर्षाखाली खर्ची घालण्यात येतो त्या लेखाशीर्षाखाली खर्ची घालण्यात यावा. नियंत्रक अधिकाऱ्यांनी पूरक मागण्या विधानमंडळाने संमत करताच या बाबीवरील खर्च संबधित कार्यात्मक प्रमुख लेखाशीर्षाखाली खर्ची टाकावा.

८. हे आदेश दिनांक १ एप्रिल १९९५ पासून अंमलात येतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

**श.वि. लागवणकर,**
शासनाचे उपसचिव

सूचना करावयाची आहे की, प्रत्येक पक्षाने काही जागा श्री.डी.बी.पाटील आणि श्री.बी.टी.देशमुख यांच्यासारख्या सभासदांसाठी राखून ठेवल्या पाहिजेत. म्हणजे या सभागृहामध्ये नव्याने येणारी जी तरुण मंडळी आहेत त्यांना उत्तमप्रकारे मार्गदर्शन होऊ शकेल. सन्माननीय सदस्य श्री. बी.टी.देशमुख हे या ठिकाणी प्रश्न विचारतात त्यावेळी ते अनेक दाखले या ठिकाणी देतात आणि आपल्या प्रश्नांना खऱ्या अर्थाने न्याय मिळवून घेतात आणि विधिमंडळाची कार्यक्षमता किती आहे ते दाखवितात. अध्यक्ष महाराज, या ठिकाणी काम कसे करावे हे सन्माननीय सदस्य श्री.दि.बा.पाटील यांच्याकडून शिकण्यासारखे आहे. तेसुद्धा लायब्ररीमध्ये जावून जुने रेफरन्स शोधून काढतात. या ठिकाणी सभागृह चालू असतांना ते जास्तीत जास्त वेळ सभागृहामध्ये उपस्थित असतात पण काही तरूण सन्माननीय सदस्य मात्र बऱ्याच वेळा कंटाळा करतात. माननीय सदस्य श्री.दि.बा.पाटील हे प्रत्यक्ष चर्चेमध्ये सहभागी होतात आणि आपले विचार प्रभावीपणे मांडतात. त्यांची २० वर्षापूर्वीची भाषणे मी लायब्ररीमध्ये जावून वाचतो त्यावेळी त्या भाषणामधून मला आजही मार्गदर्शन मिळते. ज्या दोन सन्माननीय सदस्यांना पुरस्कार देण्यात आलेला आहे त्यांनी या सदनाच्या वरिष्ठतेचा दर्जा कायम राखला आहे. मी या दोन्ही सदस्यांच्या संदर्भात शुभ चिंतन करतो आणि ज्यांनी हा ठराव आणला आहे त्यांचे आणि पुरस्कार मिळविणाऱ्या दोन सदस्यांचे अभिनंदन करून माझे भाषण संपवितो.

**श्री.नितीन गडकरी (सार्वजनिक बांधकाम मंत्री)** या सभागृहाचे सन्माननीय सदस्य श्री.बी.टी.देशमुख आणि आदरणीय श्री.दि.बा.पाटील यांचा राष्ट्रकुल संसदीय मंडळाने जो गौरव केलेला आहे हा अतिशय यथोचित असा आहे. सन्माननीय सदस्य श्री.बी.टी.देशमुख यांच्या यशाचे रहस्य काय याचा विचार केला त्यावेळी माझ्या एक गोष्ट लक्षात आली की या ठिकाणी काम करीत असतांना ज्या विषयांचा त्यांनी पाठपुरावा केला आहे त्या सर्व प्रश्नांची फाईलच त्यांनी त्यांच्याकडे करून ठेवली आहे. एवढेच नव्हे तर माझी माहिती जर बरोबर असेल तर सन्माननीय सदस्य श्री.बी.टी.देशमुख नेहमी आश्वासन समितीचे सदस्य म्हणून राहतात. आश्वासन समिती ते काही सोडत नाहीत. सभागृहातील अन्य सन्माननीय सदस्य इतर समित्यांमध्ये जाण्यास तयार असतात, कोणती समिती दौऱ्यावर जाते? कोणती समिती काय काम करते याचा विचार करून इतर सदस्य समितीमध्ये जात राहण्यास तयार असतात. परंतु सन्माननीय. सदस्य श्री.बी.टी.देशमुख यांनी जे प्रश्न विचारलेले असतात त्याचे दाखले ते तयार ठेवत असतात. सन्माननीय मंत्र्यांनी त्यांच्या प्रश्नाला काय उत्तर दिलेले आहे यासंबंधीची माहिती ते ठेवत असतात आणि जे आश्वासन त्यांनी मिळविलेले असते ते आश्वासन पूर्ण करून घेण्यासाठी माननीय मंत्रिमहोदयांकडे ते सतत फॉलोअप करीत असतात. त्यामुळे शासनाची इच्छा असो अथवा नसो सन्माननीय सदस्यांचे काम करावे लागते. श्री. देशमुख यांनी ज्यासंबंधीचे आश्वासन मिळविलेले आहे त्यासंबंधीचे काम करावे लागते. संसदीय कामामध्ये त्यांना मिळालेले हे यश आहे. अध्यक्ष महाराज, **या सभागृहामध्ये आल्यानंतर त्यांनी संपूर्ण शिक्षण क्षेत्रामध्ये आपल्याबद्दल अतिशय आदराची आणि सन्मानाची भावना निर्माण केलेली आहे. वागत असतांना, बोलत असतांना, विचार करीत असतांना परिपक्वतेचा ठसा त्यांनी निर्माण करून ठेवला आहे. विदर्भातील बॅकलॉगचा प्रश्न असो अथवा इतर ठिकाणी काही अन्यायाचा प्रश्न असो, त्यावेळी तरुणांना लाजवेल अशा पद्धतीने ते तुटून पडत होते.** अशा प्रकारे अन्यायाच्या संबंधी ते तुटून पडत असले तरी सुद्धा त्यांच्या वैयक्तिक जीवनामध्ये येणारा अनुभव मात्र वेगळा आहे. सन्माननीय सदस्य श्री.बी.टी.देशमुख हे अत्यंत योग्य, कर्तृत्ववान आणि सभागृहाची प्रतिष्ठा बाळगणारे असे सन्माननीय सदस्य आहेत. **या सभागृहाचा इतिहास ज्यावेळी लिहिला जाईल त्यावेळी ज्या सन्माननीय सदस्यांच्या नावाचा उल्लेख त्यामध्ये केला जाईल त्यामध्ये सन्माननीय सदस्य श्री.बी.टी.देशमुख यांचे नाव राहणार आहे.** या ठिकाणी त्यांचा गौरव झालेला आहे त्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो. अध्यक्ष महाराज, सन्माननीय सदस्य श्री.दि.बा.पाटील हे या सभागृहाचे भूषण आहे. त्यांनी संघर्षमय जीवन व्यतीत केलेले असल्यामुळे शेतकऱ्यांचे, सर्वसामान्य माणसाचे प्रश्न या सभागृहामध्ये त्यांनी वेळोवेळी मांडलेले आहेत. अध्यक्ष महाराज, सन्माननीय सदस्य श्री.दि.बा.पाटील आणि सन्माननीय सदस्य श्री.बी.टी.देशमुख यांच्याबरोबर या सदनामध्ये विरोधी पक्षात बसून काम करण्याची संधी मला मिळालेली आहे. अध्यक्ष महाराज, विरोधी पक्षात बसून काम करीत असतांना स्वाभाविकपणे सदनामध्ये जेवढी संधी मिळाली आहे तेवढी संधी सत्ताधारी पक्षात काम करण्यास मिळत नाही. आमच्या पैकी अनेकांना विरोधी पक्षातील काम करण्याची सवय....

**सभापती :** सत्ताधारी पक्षात असतांना काम करण्याची संधी मिळते, फक्त बोलण्याची संधी मिळत नाही.

**श्री.नितीन गडकरी :** अध्यक्ष महाराज, आपण जे सांगितले ते बरोबर आहे. अध्यक्ष महाराज, सन्माननीय सदस्य श्री.दि.बा.पाटील हे या ठिकाणी नव्याने निवडून आले होते त्यावेळी सर्व सन्माननीय सदस्यांनी त्यांचा गौरवाने उल्लेख केला होता. सन्माननीय सदस्य श्री.दि.बा.पाटील यांना लोकसभेच्या कामाचा अनुभव आहे, विधानसभेच्या कामाचा अनुभव आहे. अत्यंत कर्तृत्ववान आणि अभ्यासू आहेत. सभागृहामध्ये ते अत्यंत तळमळीने काम करीत असतात. एखाद्या प्रश्नाचा ध्यास घेवून ते सभागृहामध्ये काम करीत असतात. सन्माननीय सदस्य श्री.बी.टी.देशमुख आणि सन्माननीय सदस्य श्री.दि.बा.पाटील हे दोन सदस्य म्हणजे आमच्या दृष्टीने अभिमानाचा विषय आहे. या सभागृहाच्या प्रतिष्ठेचा विषय आहे. या दोनही सन्माननीय सदस्यांचा गौरव करण्यात आलेला आहे त्याबद्दल या दोनही सन्माननीय सदस्यांचे मी मनःपूर्वक अभिनंदन करतो. त्याच बरोबर सन्माननीय सदस्या श्रीमती संजीवनी रायकर यांनी या ठिकाणी जो प्रस्ताव मांडलेला आहे त्याला समर्थन देऊन मी माझे भाषण संपवितो.

**श्री.विजय सावंत (रायगड, रत्नागीरी-सिंधुदुर्ग स्थानिक प्राधिकारी संस्था)** : अध्यक्ष महाराज, सन्माननीय सदस्या श्रीमती संजीवनी रायकर यांनी या ठिकाणी जो अभिनंदनाचा ठराव मांडलेला आहे त्याला सहमती दर्शविण्यासाठी मी येथे उभा आहे. अध्यक्ष महाराज, सन्माननीय सदस्य श्री.दि.बा.पाटील यांच्याबरोबर मी अगदी जवळून काम केलेले आहे. मी ज्यावेळी या सभागृहामध्ये नव्याने निवडून आलो होतो त्यावेळी सन्माननीय सदस्य श्री.दि.बा.पाटील आणि सन्माननीय सदस्य श्री.बी.टी.देशमुख यांनी मला सभागृहामध्ये काम कसे करावे यासंबंधीचे मार्गदर्शन केले होते. सभागृहामध्ये जो विषय मांडावयाचा असतो त्या विषयाची माहिती कशाप्रकारे घ्यावयाची आणि तो विषय या ठिकाणी कसा मांडावयाचा या गोष्टी त्यांच्याकडून शिकण्यासारख्या आहेत. सन्माननीय सदस्य श्री.दि.बा.पाटील ही लहान लहान व्यक्तीकडून, कार्यकर्त्यांकडून एखाद्या विषयासंबंधीची माहिती घेत असत आणि त्यांनी दिलेल्या माहितीचा अभ्यास करून सभागृहामध्ये तो विषय मांडत असत. संपूर्ण माहिती घेतल्याशिवाय श्री.दि.बा.पाटील हे कधीच भाषण करीत नाहीत. त्यांच्या भाषणातून आपल्याला नवीन नवीन मुद्यासंबंधीची माहिती मिळत असते. अधिवेशन संपल्यानंतर

---

**NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION**

## "प्रा.बी.टी.देशमुख अभिनंदन विशेषांक" व एआयफक्टो च्या "चलो दिल्ली" कार्यक्रमाच्या पूर्वतयारीसाठी दौरा व सभांचे आयोजन

## सभांच्या आयोजनाबाबत सूचना

राष्ट्रकुल संसदिय मंडळाच्यावतीने संघटनेचे अध्यक्ष प्रा.बी.टी.देशमुख यांना "उत्कृष्ट संसदपटू" हा पुरस्कार देवून गौरवान्वित करण्यात आले याची आपणास माहिती आहेच. त्यानिमित्त नुटा बुलेटीनचा "प्रा.बी.टी.देशमुख - अभिनंदन विशेषांक" प्रकाशित करण्याचे नुटाच्या कार्यकारी मंडळाने ठरविले आहे. त्याचबरोबर आपल्या अत्यंत महत्वपूर्ण मागण्यांच्या संदर्भात अखिल भारतीय प्राध्यापक महासंघाने १८ मार्च १९९७ रोजी नवी दिल्ली येथे "मार्च" आयोजित केला आहे. उपरोक्त दोनही कार्यक्रम यशस्वी करण्याच्या दृष्टीने व इतरहि संघटनात्मक बाबींची चर्चा करण्याच्या दृष्टीने नुटाच्या वतीने सभांचे आयोजन करण्यांत आलेले आहे. या **सभांचे तपशील देणारा तक्ता** याच बुलेटीनमध्ये प्रसिद्ध केला आहे.

**२. सभा असलेल्या शहरी/गांवी या सभेची नोटीस काढणे व सभेचे आयोजन करण्याची जबाबदारी नुटाच्या शहर शाखेच्या पदाधिकाऱ्यांनी/स्थानिक संघटकांनी/जिल्हा पदाधिकाऱ्यांनी पार पाडावी अशी अपेक्षा आहे व तशी त्यांना विनंती आहे.**

३. सभेची नोटीस कशी असावी याचा नमुना मुद्दाम सोबत जोडलेला आहे. सभेच्या नोटीसच्या जादा प्रती आपल्या पातळीवर पुरेशा तयार करवून घ्याव्या तसे करतांना त्यावर सभेचे ठिकाण, तारीख व वेळ कृपया नमूद करावी व सर्व संबंधीतांना ती नोटीस मिळेल याची काळजी घ्यावी अशी विनंती आहे. उक्त सभेला सर्व महाविद्यालयीन शिक्षकांनी उपस्थित राहावे अशी अपेक्षा आहे.

**५. दिवसांच्या अभावी जिल्ह्यात ज्या ठिकाणी सभांचे आयोजन या दौऱ्यात करता आले नाही त्या ठिकाणी (त्या जिल्ह्यातील या दौऱ्याचे दिवस टाळून) नुटाच्या जिल्हा पदाधिकाऱ्यांनी सभांचे आयोजन करावे अशी विनंती आहे.**

**प्रा.एकनाथ कठाळे,**
**सचिव, 'नुटा'**

देखील श्री.दि.बा.पाटील हे लोकांची कामे करण्यामध्ये सतत व्यस्त असतात. ते दौऱ्यावर गेलेले आहेत, बैठकीला गेलेले आहेत असे त्यांच्या घरी विचारणा केली असता समजते. त्यांच्या कामकाजाची पद्धत पाहिल्यानंतर आपल्याला असे दिसून येईल की संपूर्ण वर्षभर ते काम करीत असतात. आम्ही मात्र ठराविक वेळेस समाज सेवा करतो आणि इतर वेळी बाकीची कामे करीत असतो. परंतु श्री.दि.बा.पाटील हे सतत लोकांची कामे करीत असतात. **सन्माननीय सदस्य श्री.बी.टी.देशमुख हे अत्यंत अनुभवी असून त्यांच्या बरोबर मी तीन चार वर्षे काम केलेले आहे. बाकी आम्ही स्वतःचे काम करतो पण ते स्वतःचे काम काहीही करीत नाहीत.** अध्यक्ष महाराज, सन्माननीय ज्येष्ठ सदस्य श्री.बी.टी.देशमुख यांच्याबरोबरही मला काम करण्याची संधी मिळाली आहे त्यांच्याबरोबर आश्वासन समितीमध्ये काम करण्याचे सौभाग्य मला मिळाले आहे, त्यावेळी त्यांची काम करण्याची पद्धत, माहिती मिळविण्याची पद्धत मला पहावयास मिळाली आहे. त्यातून मला खुप काही शिकावयास मिळाले आहे. स्थानिक गोष्टीबद्दल, कामाबद्दल आश्वासन दिले असेल तर तेथील लोकांना भेटून, संबंधित अधिकाऱ्यांना भेटून त्यांच्याशी बोलतांना ते कधीही मला गरम झालेले दिसले नाहीत. इतकेच काय **पण श्री.बी.टी.देशमुख यांनी सभागृहात आपली बाजू आग्रही मांडताना दिलेले रेफरन्स इतके स्पष्ट असतात की, त्यामुळे सभापतींना देखील त्यांची बाजू घेऊन शासनाला, मंत्र्यांना योग्य त्या सूचना द्याव्या लागतात. त्यांना दिलेल्या आश्वासनाची पूर्तता करण्याच्या दृष्टीने आदेश द्यावे लागलेले आहेत की जे आतापर्यंत अन्य कोणाही सदस्याच्या बाबतीत असे झाल्याचे आजवर मला या ठिकाणी दिसलेले नाही.** श्री.बी.टी.देशमुख यांच्याकडे ते मांडीत असलेल्या वा मांडलेल्या प्रश्नाविषयीची सर्व माहिती जय्यत तयार असते, त्यासंबंधात यापूर्वी सदनामध्ये झालेली चर्चा, त्यावर मंत्र्यांनी दिलेले आश्वासन आदी सर्व कागदपत्रांची फाईल त्यांनी तयार केलेली पाहिल्यानंतर आपल्याला त्यांच्याकडून खूप काही शिकण्याची संधी आहे हे माझ्यासारख्या नवख्या सदस्याला वाटल्याखेरीज रहात नाही. मंत्रालयातील मंत्र्यांकडे इतकेच काय पण अधिकाऱ्यांकडे देखील जेवढी माहिती नसते तेवढी त्या त्या प्रश्नासंबंधीची माहिती बी.टी.देशमुखांकडे तयार असते. तेव्हा अशा सन्माननीय श्री.बी.टी.देशमुख, श्री.दि.बा.पाटील यांच्या सारख्यांची साथ आम्हाला या सदनामध्ये सदैव राहील अशी अपेक्षा करून मी भाषण संपवितो.

**श्री.सुरेश पाटील (पुणे विभाग शिक्षक) :** अध्यक्ष महाराज, या सदनातील एक जेष्ठ सदस्य आणि आमच्या गटाचे गटप्रमुख माननीय प्रा. बी.टी.देशमुख आणि या सदनातील दुसरे एक ज्येष्ठ सदस्य श्री.दि.बा.पाटील यांना अनुक्रमे उत्कृष्ट संसदपटू आणि उत्कृष्ट वक्ता म्हणून पुरस्कार मिळालेला आहे, त्याबद्दल अभिनंदन करणारा जो ठराव या ठिकाणी सन्माननीय सदस्या रायकरताई यांनी मांडला आहे, त्याला पाठिंबा देण्यासाठी मी उभा आहे. अध्यक्ष महाराज, **या सभागृहामध्ये आल्यानंतर माझ्या सुदैवाने गटप्रमुख म्हणून श्री.बी.टी.देशमुख यांच्यासारखे एक निष्णात संसदपटू आम्हाला लाभले आणि त्यांच्या हाताखाली काम करण्याची आम्हाला संधी मिळाली त्यामुळेच या सदनामध्ये कोणत्या पद्धतीने काम करावे हे शिकण्याची एक चांगली व मोठी संधीही आम्हाला लाभली आहे.** गटप्रमुख म्हणून काम करीत असतांना आम्ही त्यांच्याकडे जेव्हा काही कामे घेऊन जातो, प्रश्न संकलन करून घेऊन जातो, तेव्हा ज्याला पुरावा नाही कागदोपत्री आधार नाही, केवळ वर्तमानपत्रात बातमी आली असे कोणतेही काम वा प्रश्न ते कोठल्याही प्रकारे स्वीकारत नाहीत. ज्याला वस्तुस्थितीचा आधार आहे, या प्रश्नातून आपल्याला नेमके काय मिळवायचे आहे हे ते विचारीत असत आणि त्या निकषात बसणारेच प्रश्न ते या ठिकाणी मांडत असत आणि आम्हालाही तशी शिकवण त्यांनी दिलेली आहे. त्यात त्यांनी आम्हाला हेही शिकविले आहे की, उगीच प्रश्न टाकून सभागृहाचा वेळ घ्यायचा नाही. त्यांची ही शिस्त पाळण्याचे काम त्यांनी आम्हाला शिकविले. त्यांनी आम्हाला काय काय शिकविले हे सांगत असतांना मला आपल्याला सांगितले पाहिजे की, माझ्या निवडणुकीच्या काळामध्ये मी केलेल्या कामाचा जो अहवाल मी दिलेला आहे त्यात एकच वाक्य मी त्यांच्याबद्दल लिहिले आहे की, सन्माननीय श्री.बी.टी.देशमुख यांनी आम्हाला काय काम करावे हे शिकविले नाही तरी काय करू नये हे मात्र जरूर शिकविले आहे आणि आम्हाला ही लक्ष्मणरेषा

## NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION

**"प्रा.बी.टी.देशमुख अभिनंदन विशेषांक" व एआयफक्टो च्या "चलो दिल्ली"**

***कार्यक्रमाच्या पूर्वतयारीसाठी दौरा व सभांचे आयोजन***

महाविद्यालयीन प्राध्यापकांची सभा

# सभेची सूचना

राष्ट्रकुल संसदिय मंडळाच्यावतीने संघटनेचे अध्यक्ष प्रा.बी.टी.देशमुख यांना "उत्कृष्ट संसदपटू" हा पुरस्कार देवून गौरवान्वित करण्यात आले. त्यानिमित्त नुटा बुलेटीनचा "प्रा.बी.टी.देशमुख - अभिनंदन विशेषांक" प्रकाशित करण्याचे नुटाच्या कार्यकारी मंडळाने ठरविले आहे. त्याचबरोबर आपल्या अत्यंत महत्वपूर्ण मागण्यांच्या संदर्भात अखिल भारतीय प्राध्यापक महासंघाने १८ मार्च १९९७ रोजी नवी दिल्ली येथे "मार्च" आयोजित केला आहे. उपरोक्त दोनही कार्यक्रम यशस्वी करण्याच्या दृष्टीने व इतरहि संघटनात्मक बाबींची चर्चा करण्याच्या दृष्टीने नुटाच्या वतीने सभांचे आयोजन करण्यांत आलेले आहे.

नुटाचे सचिव प्रा. एकनाथ कठाळे, उपाध्यक्ष प्रा. सी.डी.कोंगरे, सहसचिव प्रा. अनिल ढगे, कोषाध्यक्ष प्रा.शीतल तिवारी, 'नुटा बुलेटीन'चे संपादक प्रा. अनिल सोमवंशी, कार्यकारी मंडळाचे सदस्य प्रा.एस.बी.चिंचमलातपूरे, डॉ. ए.एस. सातपूतळे, जिल्हा युनिटचे अध्यक्ष व सचिव हे या सभांना उपस्थित रहातील. तरी आपण कृपया सभेस उपस्थित राहावे ही विनंती.

सभेचा दिवस व तारीख :-

सभेची वेळ :-

सभेचे स्थळ :-

आपले विनित

ओलांडण्याची परवानगी त्यांनी कधीही दिलेली नाही. अशा ज्येष्ठ सदस्याच्या हाताखाली काम केल्यामुळे आम्हाला येथेच नव्हे तर बाहेरही काम कसे करावे, कोणत्या पद्धतीने काम करावे, आयुधांचा कोणत्या प्रकारे वापर करावा हे त्यांनी आम्हाला तर दाखवू दिलेच पण आपल्या स्वतःच्या कामातून त्यांनी या सभागृहालादेखील दाखवून दिलेले आहे. या ठिकाणी त्यांचा जो सन्मान झाला आहे, तो आमच्या सर्व माननीय सदस्यांचा झाला आहे. मी व्यक्तीशः तसेच आमच्या गटातर्फे मा. श्री.बी.टी.देशमुख यांना अशीच पुढे काम करण्याची संधी मिळो अशी प्रार्थना करतो तसेच त्यांना दिर्घायुरोग्य लाभो अशीही परमेश्वराजवळ प्रार्थना करतो.

सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.दि.बा.पाटील हे शेतकरी कामगार पक्षाचे नेते आहेत. त्यांनी जनतेची चळवळ अतिशय प्रभावीपणे राबविली आहे. संयुक्त महाराष्ट्राची चळवळ, नव्या मुंबईच्या आरक्षित जमिनीचा प्रश्न किंवा अन्य सामाजिक प्रश्न त्यांनी अतिशय पोटतिडकीने या सभागृहात मांडले आहेत तसेच बाहेरही मांडले आहेत. सर्वसामान्य गरीब माणसाला न्याय मिळविण्याच्या दृष्टीने त्यांचा सातत्याने प्रयत्न राहतो. कायद्याचा अभ्यास करून कायदेशीररित्या ते प्रश्न सोडविण्याचा त्यांचा नेहमीच प्रयत्न राहतो. माननीय श्री.दि.बा.पाटील यांना उत्कृष्ट वक्ता म्हणून पुरस्कार लाभला आहे. म्हणून या दोनही सदस्यांना दिर्घायुरोग्य लाभो अशी ईश्वर चरणी प्रार्थना करतो तसेच आपणही मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल माननीय सभापती महोदय आपले आभार मानून मी माझे भाषण पूर्ण करतो.

**सभापती** : हे पुरस्कार मी स्वतःच जाहीर केले असल्यामुळे मी यावर काही बोलणार नाही. एक गोष्ट मात्र मला या निमित्ताने सर्व माननीय सदस्यांना सांगावयाची आहे. **आता आपण कॉम्प्युटर घेणार आहोत आणि ते सर्व कॉम्प्युटर लायब्ररीमध्ये बसविण्यात येणार आहोत. कॉम्प्युटरचे शिक्षण देण्यासाठी काही तज्ञ माणसांनाही बोलविण्यात येणार आहे. मा. सदस्य श्री.बी.टी.देशमुखही आपल्याला मदत करतील.** या कॉम्प्युटरचा उपयोग सर्व माननीय सदस्यांना झाल्याशिवाय राहणार नाही. पाच ते सात सदस्यांची एक बॅच करून तीन आठवड्याचे प्रशिक्षण देण्यात येणार आहे. आपण या ठिकाणी दोन ते तीन कॉम्प्युटर घेणार आहोत. मा. सदस्य श्री.बी.टी.देशमुख आणि श्री.दि.बा.पाटील यांना पुरस्कार दिले आहेत. माननीय सदस्यांची भाषणे ऐकल्यानंतर हा निर्णय योग्य आहे असे मी समजतो. या ठिकाणी त्याबाबत मी सर्व माननीय सदस्यांचे आभार मानीत आहे.

**श्री.दि.बा.पाटील (महाराष्ट्र विधानसभा सदस्याद्वारे निर्वाचित)** : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.बी.टी.देशमुख यांना उत्कृष्ट संसदपटू आणि मला उत्कृष्ट वक्ता म्हणून पुरस्कार मिळाल्याबद्दल माननीय सदस्या श्रीमती संजीवनी रायकर यांनी जो अभिनंदनाचा प्रस्ताव मांडला आहे आणि त्यावर त्यांनी तसेच इतरही माननीय सदस्यांनी ज्या भावना व्यक्त केल्या आहेत, त्याबद्दल मी सर्वांचे मनापासून आभार मानीत आहे. या अभिनंदनाच्या प्रस्तावावर विचार व्यक्त करताना सन्माननीय मंत्रिमहोदय श्री. प्रमोद नवलकर, सन्माननीय सदस्य श्री.अरुण मेहता, श्रीमती नीला देसाई,श्री.व्यंकाप्पा पतकी, सन्माननीय मंत्रिमहोदय श्री.नितीन गडकरी, मा. सदस्य श्री. विजय सावंत, श्री.सुरेश पाटील यांनी आपले विचार व्यक्त केले आहेत. त्यांचे मी मनापासून आभार मानीत आहे. हे पुरस्कार राष्ट्रकुल संसदीय मंडळाने देण्याची नवीन प्रथा सुरू केली आहे. त्याप्रमाणे या वर्षी खालच्या सदनातील दोन माननीय सदस्यांना आणि वरच्या सदनातील मला आणि बी.टी.देशमुख यांना हे पुरस्कार देण्यात आले आहेत. याबद्दल सर्व माननीय सदस्यांनी आनंद व्यक्त केला आहे. या सर्व माननीय सदस्यांनी माझे अभिनंदन केले त्याबद्दल मी त्यांचे मनःपुर्वक आभार मानतो. आणि हे आभार मानत असतांना हा पुरस्कार मिळण्यामागे आपण वर्णन केल्याप्रमाणे जसे आमचे काम आहे त्याचबरोबर या सभागृहातील सत्ताधारी व विरोधी पक्ष आणि आपलेही मला जे सहकार्य मिळाले त्यामुळे मी याठिकाणी काम करू शकलो याची मला स्वतःला जाणीव आहे. मी ज्या शेतकरी कामगार पक्षात होतो त्या पक्षाचे सुरुवातीला तीनच सदस्य होते. आणि सदस्य संख्येवर मिळणारा वेळ लक्षात घेतला असता, विचार व्यक्त करण्यासाठी जो वेळ हवा असतो तो मला मिळू शकला नसता. परंतु या सभागृहामध्ये आल्यानंतर त्यावेळचे सत्ताधारी व विरोधी पक्ष आणि आपणाकडून जे सहकार्य मिळाले त्यामुळे माझे विचार मी याठिकाणी माझ्या पद्धतीने व्यक्त करू शकलो. त्याबद्दल मला जो पुरस्कार मिळाला आहे त्याचे मानकरी आणि श्रेय द्यावयाचे झालेतर मी असे म्हणेन की, या साऱ्या सभागृहातील मा. सदस्य आणि आपणास असल्यामुळे मला हा पुरस्कार मिळाला. त्याबद्दल आपणा सर्वांनी ज्या भावना व्यक्त केल्या आहेत त्याबद्दल मी आपणा सर्वांचा अत्यंत ऋणी आहे, आपणा सर्वांचा आभारी आहे.

**प्रा.बी.टी.देशमुख (अमरावती विभाग पदवीधर)** : सभापती महोदय, राष्ट्रकुल संसदीय मंडळाच्या महाराष्ट्र शाखेने उत्कृष्ट संसदपटू म्हणून मला जो पुरस्कार दिला आणि सन्माननीय सदस्य श्री.दि.बा.पाटील यांना उत्कृष्ट भाषणाबद्दल जो पुरस्कार दिला त्याबद्दल अभिनंदनाचा प्रस्ताव माननीय सदस्या श्रीमती संजिवनीताई रायकर यांनी मांडला व सभागृहाच्या दोन्ही बाजूच्या माननीय सदस्यांनी त्या प्रस्तावाच्या निमित्ताने ज्या भावना व्यक्त केल्या, विशेषतः नामदार श्री. प्रमोद नवलकर व नामदार श्री.नितीन गडकरी, माननीय सदस्य सर्वश्री अरुण मेहता, व्यंकाप्पा पतकी, विजय सावंत, सुरेश पाटील, व माननीय सदस्या श्रीमती नीला देसाई यांनी याबाबत ज्या भावना व्यक्त केल्या आणि आपण पुरस्कार देणाऱ्या निवड समितीचे प्रमुख असल्यामुळे आपणही काही विचार व्यक्त केले त्याबद्दल मी आपले मनःपूर्वक आभार मानतो. सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.दि.बा.पाटील यांनी भावना व्यक्त करतांना सांगितले ते खरेच आहे. सभागृहामध्ये एखादा सदस्य काम करीत असतांना तो त्या सभागृहाचा एक भाग असतो. त्याचे कोणतेही काम यशस्वी व्हावयाचे असेल तर सभागृहामध्ये असलेल्या इतर सर्व घटकांची भूमिका महत्त्वाची असते. त्यांची उपस्थिती आवश्यक असते. सभागृह ही एक मोठी यंत्रणा असते. त्यांचा एक भाग म्हणून सदस्य सभागृहामध्ये काम करीत असतात. मी याठिकाणी पाहिले आहे की, सत्ताधारी पक्ष आणि विरोधी पक्ष यामध्ये भेदभाव असतो परंतु हा भेदभाव सुद्धा त्या प्रश्नाचे महत्त्व लक्षात घेवून बाजूला सारला जातो याचा उत्तम अनुभव मी या सभागृहामध्ये घेतला आहे. या सभागृहामध्ये काम करीत असतांना माझी अशी एक भावना झाली आहे की, या सभागृहातील लहानात लहान सदस्य सुद्धा काम करीत असतांना खूप मोठा होतो, जर त्याने सार्वजनिक महत्त्वाचा, लोकांच्या जिव्हाळ्याचा प्रश्न मांडला असेल तर. आणि मोठ्यात मोठा सदस्य सुद्धा खूप लहान होतो, जर त्याने किरकोळ स्वरूपाचा प्रश्न मांडला असेल तर. अमरावतीच्या पाणीपुरवठ्याचा प्रश्न मी या सभागृहामध्ये मांडला. ४०० बोअरमधून पिण्यासाठी हे गाव पाणी घेत होते. याबाबतचा एक रिपोर्ट मंत्रिमहोदयांना मिळाला होता पण त्यांना माहीत नव्हते "बोअर फेल झाले तर गाव उठवावे लागेल" हे त्यातील अवतरण सभागृहामध्ये मी वाचून दाखवले. त्यावेळी या सभागृहामध्ये नगरविकासमंत्री श्री. सुब्रमण्यन यांच्याविषयी सत्ताधारी आणि विरोधी पक्षांच्या सदस्यांनी आपापल्या ज्या भावना व्यक्त केल्या आणि सभापती म्हणून त्या स्थानावरून आपण जे उद्‌गार काढले त्यामुळे केवढा फरक पडला. मला वाटते त्या प्रश्नाचे जे गांभीर्य आहे ते याठिकाणी स्पष्ट झाले. माझ्या परवाच्या विदर्भ विकासावरील भाषणात मी म्हणालो "महाराष्ट्र हे राज्य ही आमच्या पूर्वीच्या पिढीने मिळविलेली उपलब्धी आहे आणि अनुशेष हे आमच्या एका पीढीचे पाप आहे." सभागृह संपल्यावर मा. सदस्य श्री. अरविंद सावंत मला म्हणाले की, "तुम्ही हे वाक्य वापरले त्यावेळी माझ्या अंगावर शहारे आले" **ज्यावेळी त्या प्रश्नाशी समरस होवून तो प्रश्न आपण सभागृहामध्ये मांडतो, त्यावेळी त्या सभागृहाच्या माध्यमातून मिळणारी जी दाद असते ती सदस्यांच्या जीवनातील फार मोठी उपलब्धी असते. आणि त्या उपलब्धीची भली थोरली शिदोरी सोबत घेवून लोकप्रतिनिधी म्हणून जगण्याची जी जागती संधी मला मिळाली ते मी माझे भाग्य समजतो.** हे अभिनंदन स्वीकारीत असतांना मी जे प्रश्न मांडू शकलो त्यापेक्षा कितीतरी प्रश्न मांडू शकलो नाही याची मला जाणीव आहे. ज्या बाबतीत आयुधांचा आपण या ठिकाणी वापर करू शकलो त्यापेक्षा कितीतरी बाबतीत आयुधांचा वापर आपण करू शकलो नाही याची मला नम्र जाणीव आहे. राष्ट्रकुल संसदीय परिषदेने हा पुरस्कार दिला आहे व प्रस्ताव मांडून आपण अभिनंदन केले आहे, त्याबद्दल मी आभारी आहे.

अध्यक्ष महोदय, एका गोष्टीचा मला उल्लेख केला पाहिजे. विरोधी पक्ष व सत्ताधारी पक्ष मा. सभापती, उपसभापती यांच्याशिवाय आपला जो अधिकारी व कर्मचारी वृंद आहे त्याच्याबाबतही मला बोलले पाहिजे. प्रत्येक अधिवेशनानंतर मी पत्र लिहीत असतो, आमचे जे प्रश्न अस्वीकृत झाले ते का झाले? आम्हाला ताबडतोब कारणे कळतात. पुढे दुरुस्ती करता येते. अस्वीकृत होणाऱ्या प्रश्नाची संख्या मग कमी कमी होत गेली आहे असे दिसून येते. विधानमंडळाचे सचिव श्री. आर.बी.कांबळी आणि त्यांचा अधिकारी व कर्मचारी वर्ग हे सर्व काम मान मोडून व एका विशिष्ट निष्ठेने करीत असतात. समोर आलेली कामे यशस्वीपणे पण नियमाप्रमाणे ते करीत असतात. आमच्या यशातील त्यांच्या सहभागाचा उल्लेख करणे मला आवश्यक वाटते. अध्यक्ष महोदय, या ठिकाणी होणाऱ्या प्रत्येक चर्चेची पुर्व सूचना दोन्ही बाजूंच्या सदस्यांना असते ती आमच्यापर्यंत आणण्याचे काम आपल्या नेतृत्त्वाखालील आपला अधिकारी व कर्मचारी वृंद करीत असतो व तेही अत्यंत चांगल्या प्रकारे. माझ्या या भावनेशी दोन्ही बाजूचे सदस्य सहमत असतील याविषयी मला खात्री आहे. अभिनंदन करण्यासाठी सभागृहाने प्रस्ताव मांडल्याबद्दल व त्यातुन व्यक्त झालेल्या एकमताच्या भावनेबद्दल मी या सभागृहाप्रती अतीव आदर व्यक्त करतो, मनापासून आभार मानतो व माझे भाषण पूर्ण करतो.

*******

# SECRETARY'S REPORT ON THE WORKING OF THE ASSOCIATION FOR THE YEAR ENDING ON 31ST DECEMBER, 1996.

*Prepared by the Executive Committee of NUTA under Article (VI) **(b) (ii)** of the Constitution of NUTA and presented by the Secretary on behalf of the NUTA Executive.*

Dear Friends,

(1) It gives me great pleasure to accord you all a cordial welcome on behalf of the Executive Committee of NUTA and on my own behalf. It is indeed a proud privilege for me to place before this august body a brief account of our activities and achievements during the year 1996.

(2) Right from its inception, NUTA has been committed to the cause of the welfare of the Teachers' community. In keeping with this commitment, the organisation took up several issues concerning teachers during the period of this report.

(3) During this year, the organisation succeeded in getting a few demands fulfilled by the government. Prof. B.T. Deshmukh followed up these issues with his characteristic perseverance in the Legislative Council and got some of the important Government resolutions issued. In this context, a classic example is the Government Resolution No. "उच्च व तंत्रशिक्षण आणि सेवायोजन विभाग, शासन निर्णय क्रमांक - एनजीसी १२९५/५७८१७/प्रकरण क्र. ३१०९ विशि-४ दिनांक - २८ नोव्हेंबर, १९९६." releting to Leave Travelling Concession to the College and University staff. The starred question relating to this subject was first asked vide S.Q.No. 1372 on 9th Aug.95, and the progress and follow-up of the same traversed in a surprising fashion and culminated in the favourable gesture of the Govt, emerging as the government resolution mentioned above.

Government Resolutions relating to the Designation of Reader to the teachers having Ph.D., counting of service in Primary Schools for the purpose of pensionery benefits, and extension of U.G.C. scales to the Librarians in Social work colleges are issued during the year.

(4) **SHIKSHAK BHAVAN** : The members of NUTA will recall that the State Government had issued an order dated 30.9.95 directing the Amravati University to withdraw it's action regarding the handing over of the Shikshak Bhavan to NUTA. Elaborating factual position regarding this issue, we had appealed to you to be ready for the struggle that may have to be launched against the attitude of the government and to uphold the spirit of just and legal claim of the teachers' community.

(5) The organisation had also filed a petition no. 3828 of 1995 in the High Court. And Hon'ble Nagpur Bench of Bombay High Court granted a stay to the operation of the above order. Prof. B.T. Deshmukh also raised the issue in the House through calling attention motion and succeeded in extracting an assurance from the government that it would clarify its position within 15 days after winter session. Finally, in view of the solidarity exhibited by the teaching community to fight for their rightful claim the government was forced to issue an order dated 22.1.96 withdrawing the said order. It was indeed a great victory for the organisation.

(6) **CONDITION OF NET/SET** : The Organisation has all along stated that the condition of eligibility test was for the candidates seeking employment as a teacher in a college or a University and not for the teachers already in service. Ultimately the government also realised a point in the stand taken by the organisation and issued a G.R. dated 22.12.95. Although the said G.R. offered some relief to the affected teachers, by doing away with the condition of passing NET/SET before 31.3.96, the government also sought to impose some new irrational conditions like not allowing annual increment, not counting the service for career advancement and seniority etc. till the clearance of eligibility test. The organisation has already communicated to the government its disagreement with these conditions since they were inconsistent with the orders of the central and state governments and the agreement with MFUCTO.

(7) In response to the call of MFUCTO, several teachers in Nagpur and Amravati Universities area sent letters between 1.3.96 and 15.3.96 to the Chief Minister protesting against the G.R. dated 22.12.95.

(8) NUTA has not only been committed to the cause of the teachers but has also exhibited its commitment to the social cause in general. During the current year NUTA has brought out two special issues one on "Ghatanji water Supply Scheme" and the other on "Backlog". It will appear from the Ghatanji Water Supply Scheme Issue' that the construction of the scheme at Ghatanji could be completed in time due to Prof. B.T. Deshmukh's sillful handling of the legislative devices in the Council. The 'Backlog Special' is one of the most

---

**THE HIGH COURT OF JUDICATURE AT BOMBAY**

(ordinary original civil jurisdiction)

***WRIT PETITION NO. 1755 OF 1996***

Bombay University & College Teachers Union & Ors .... Petitioners

***VERSUS***

The State of Maharashtra & Ors .... Respondents

***CORAM :* A.P. SHAH, J**

Dated : 20th Sept., 1996

Called writ petition for admission.
Shri. J.G. Gadkari with S.S.Pakale for petitioners
Shri. R.V. Govilkar for Respondents
P.C. : Interim relief in terms of prayer clause (b) and (c) liberty to apply.
The prayer (b) and (c) in the petition is as under :

"(b) pending hearing and final disposal of this Petition this Hon'ble Court may be pleased to stay the implementation of the said circulars and/or effect of the said circulars from their dates of issuance viz., 2nd may 1996 and 20th June 1996 in case of teachers already appointed for the academic year 1996-97, and the appointments made till the final hearing and disposal of the petition.

"(c) This Hon'ble Court pending the hearing and final disposal of this petition be pleased to direct the first respondent not to cause any changes or amendments to rules under the said Act. Providing for eligibility tests."

Sd / **K.K.. Trivedi**
Certified to be a True Copy
this 4th day of November 1996
Sd/ For Prothonotary and senior Master
(Seal) of the High Court.

---

important documents on the subject and is a product of meticulous and scientific study. The document is expected to serve as a valuable reference booklet on the issue of backlog. Both these documents reflect sincere efforts put in by Prof. B.T.Deshmukh as a member of the Legislative Council.

(9) **DHARNA AT BOMBAY** : A large number of teachers from Nagpur and Amravati Universities area took part in the "Dharna" staged at Mantralaya, Bombay on 10.12.96. The "Dharna" was in response to a call of AIFUCTO and MFUCTO to demand inter alia immediate publication of the reports of U.G.C. Pay Review Committee and the Fifth Central pay Commission and all the three instalments of interim relief at par with teachers in Central Universities and several states where state scales are automatically linked to central scales.

(10) **REINSTATEMENT OF PROF. SUSHILKUMAR KALMEGH AND PROF. KU. SWATI MANDLE.** : The reinstatement of Shri Sushilkumar Kalmegh and Ku. Swati Mandle, both lecturers in Computer Science Department of Amravati University was another noteworthy achievement for the organisation. Both these teachers were selected by the duly constituted selection committee and possessed requisite qualifications at the time of recruitment. Nevertheless, they were given short-term appointment orders and stood terminated at the end of the session. The termination came into effect because of the refusal of the University to change their orders into continuous appointment in the light of the G.R. dated 22.12.95. The Hon'ble Tribunal had also ordered the reinstatement of these two teachers and although the University extended the benefit of the G.R. dated 22.12.95 to several teachers in affiliated colleges, it refused to follow its orders in respect of its own teachers. The organisation was therefore forced to resort to the means of agitation. About 300 teachers led by Prof. Eknath Kathale, Secretary NUTA staged stormy demonstrations at the Senate meeting of Amravati University held on 14.11.96. Prof. B.T.Deshmukh, the member of the Senate moved an adjournment motion in the House. Following a long debate on the motion, the University agreed to issue the order of reinstatement to these teachers on 14.11.96. The University then also withdrew the case filed in the High Court.

(11) I congratulate the teachers for exhibiting their united strength and thank the members of the Senate for extending their support on this issue.

(12) Prof. B.T. Deshmukh has made his mark as the most noteworthy member of the Legislative Council ever since he entered the Council in 1980. With his rare qualities of studiousness and skillful handling and employment of devices in the House, he has carved a special place for himself in the Legislature. It was in recognition of this extraordinary and brilliant performance of his that he has been awarded the first "Best parliamentarian" '**उत्कृष्ट संसदपटु**' award for this year by the Maharashtra Branch of Commonwealth Parliamentary Association. We are proud of the fact that he is the first receipant of such award. The citation presented to him very aptly brings out the qualities which made him such an exemplary parliamentarian. The citation reads :-

"श्री. भाऊराव तुळशीरामजी देशमुख, विधानपरिषद सदस्य हे गेली १५ वर्षाहून अधिक काळ संसदीय प्रणालीचा पाया मजबूत करण्यामध्ये एक अग्रेसर म्हणून ओळखले जातात. सन १९८० मध्ये त्यांनी जेव्हा विधानमंडळामध्ये प्रवेश केला तेव्हापासून त्यांनी आपली संसदीय प्रणाली अधिक भक्कम होण्यासाठी भरीव योगदान दिले आहे. सामाजिक जाणिवेची निसर्गदत्त देणगी आणि उत्कृष्ट धैर्य त्यांना लाभल्याने त्यांनी नेहमीच राज्यातील जनतेच्या भल्यासाठी निक्षून आणि अत्यंत निर्धाराने आपली बाजू मांडली. त्यांनी अभ्यास व तपश्चर्येव्दारा वाटचाल केली आणि अशा तऱ्हेने त्यांनी लोकांच्या समस्यांचा आवाका आणि व्याप्ती पूर्णपणे समजून घेतली. त्यांची उपजत बुद्धिमत्ता आणि कार्यकुशलता यामुळे त्यांचे विशेष व्यक्तिमत्व बनले आहे. विविध विषयांचे अर्थपूर्ण व सुलभ विशदीकरण करण्याच्या त्यांच्या हातोटीमुळे महाराष्ट्र विधानमंडळाच्या माध्यमातून संसदीय प्रणाली सजीव आणि समृद्ध होण्यास मदत झाली आहे. विधिमंडळाचे नियम आणि कार्यपद्धती यावर असलेली त्यांची उत्तम पकड आणि संसदीय सभ्याचार व प्रतिष्ठा तसेच समित्यांच्या कामांची उत्तम जाण याकरिता '**उत्कृष्ट संसदपटु**' हा पुरस्कार त्यांना देण्यात राष्ट्रकुल संसदीय मंडळाच्या महाराष्ट्र शाखेला अतिशय आनंद होत आहे."

(13) we take great pride in the honour conferred on Prof. B.T.Deshmukh as it is a tribute not only to prof. Deshmukh but also to the organisation of teachers which he leads.

(14) **TASK AHEAD** : The Organisation has demanded the withdrawal of the G.Rs dated 19.6.96 and 22.2.96 relating to the size of class strength, since they are in violation of consensus no 2 of the Government's agreement with MFUCTO of 15.7.77 and also that of the existing statutes and ordinances in the Universities. The Organisation has also demanded the withdrawal of the G.R. dated 22.5.96 prescribing norms for practical batch and the issuance of an appropriate order in accordance with the Judgement dated 10.1.85 of the high Court in this matter. Compelling the government to withdraw irrational conditions regarding NET/SET imposed by the G.R. of 22.12.95 is another important task ahead.

(15) The teaching community will have also to be prepared to fight for the issues of revision of pay-scales and counting of past service of tutors/Demonstrators/ Field work supervisors for the purpose of carreer advancement.

(16) **MEMBERSHIP OF NUTA** : The NUTA membership has reached upto 3505 at the end of this year. This year the increase in membership is 100

(17) I am glad to inform you that NUTA Bulletin has completed 20th year of its purposeful existence. This year we have circulated 148 pages of NUTA Bulletin. If you go through the NUTA Bulletin from 1st to last page, you will find that NUTA Executive has tried to give up-to-date information to all its members about their problems and how the NUTA Executive particularly its President Prof. B.T.Deshmukh, has focussed them at Maharashtra Govt. level through the Legislative Council.

(18) I am thankful to the press and their representatives both from Nagpur & Amravati areas for wide coverage to the activities of the Association. This report shall not be complete unless I acknowledge the active cooperation and support of all the members of NUTA and also non members i. e. University, College and Junior College Teachers in the activities of the Association and response given by them to the various calls given by NUTA from time to time.

Yours
**(E.H.Kathale)**
Secretary, NUTA.

*******

# IN THE HIGH COURT OF JUDICATURE AT BOMBAY
## ORDINARY ORIGINAL CIVIL JURISDICTION
## *WRIT PETITION NO. 1144 OF 1996*

Prof. C.P.Singh Anil ... ***Petitioner*** **Vs. 1.** The Administrative Officer, Higher Education Grants, Mumbai Division, Bombay-400 016. **2.** The Secretary, Higher & Technical Education & Employment, Department, Mantralaya, Mumbai-400 032. **3.** The Director of Education, Maharashtra State, Pune. **4.** State of Maharashtra, **5.** Royal College of Arts, Science & Commerce, Shri Shastri Housing Complex, Mira Road, Thane- 4001 104. ***Respondents.*** Shri. G.M. Kothari for the petitioner Ms Anjali Desai for the ***Respondents.***

**CORAM : A.P.SHAH J.**

DATED ; DECEMBER 5, 1996.

ORAL ORDER ;

This petition under article 226 takes exception to the order dated 2nd December, 1995 passed by the under secretaty to the Government of Maharashtra, denying pension to the petitioner on the sole ground that the college from which the petitioner retired was not receiving 100% grant as per Government Resolution No. NGC-1793/2560/ws-4 dated 22nd November, 1993. Briefly, the facts are that the petitioner worked as a lecturer in various arts and science colleges during the period from 1st June, 1963 till his retirement on 30th June 1989. i.e. for nearly 26 years the petitioner worked as a lecturer in aided colleges. On 1st July, 1989 the petitioner joined Royal College of arts, science and commerce as a lecturer and after rendering about 4 years' service , he retired on 30th June, 1993.

2. As required by the procedure six months prior to his retirement the petitioner's pension papers were forwarded to the state Government. No decision was taken by the State Government for nearly two years ultimately by the impugned order dated 2nd December, 1995, the under secretaty to the government of maharashtra informed the principal of Royal College of arts, science and commerce that the petitioner is not eligible to receive pension. The Under Secretary in his letter stated that the service put in the college, to which no grant has been granted, which is to be made applicable for pension, should have complete 100% grant on the date of retirement of the concerned employee. The college from which the petitioner retired was on 25% grant at the time of his retirement. Thus he has not retired from the college which has 100% grant and as such he is not eligible for pension.

3. In my opinion, the order passed by the Under secretary is wholly illegal. He has completely misconstrued the relevant Government Resolutions and denied pension to the petitioner who has admittedly, put in nearly 30 years of service, out of which 26 years was in fully aided colleges. This will be clear from a bare reading of the three relevant Government resolutions dealing with the subject the first is Government. Resolution bearing No. NGC-1283/(865)/UNI-4 dated 21st July, 1983 which is annexed at exhibit "A" to the petition: By this GR the pension, grantuity and other retirement benefits admissible to the Maharashtra State Government servants under the Maharashtra Civil Services (pension) Rules, 1982, including the Family pension, 1964 contained therein were made applicable to full time approved teaching and the non-teaching staff in recognised aided non-Government arts. Science, commerce and education colleges and the non-agricultural Universities in the State who retired or retire on or after 1st October, 1982. Under the said GR the employees who were in service in non-Government arts, Science, commerce and education colleges and the non-agricultural Universities in the State as on 30th September, 1982 were eligible for contributory provident fund scheme or to come under this scheme. The employees who have retired on or after 1st October, 1982 were also eligible to exercise the option. The option was to be exercised in writing before 31st January, 1984 in the manner prescribed by the GR. The employees who do not exercise the option within the stipulated period shall be deemed to have opted for the retention of the benefits admissible to them prior to 1st October, 1982. It is required to be mentioned that prior to the issuance of the GR of 1983, pensionary benefits available to the State Government servants were not applicable to the lecturers working in non-aided arts. Science, commerce and education colleges and non-agricultural Universities. These benefits were made admissible for the first time by GR dated 21st July, 1983. There is no dispute that the petitioner had opted for the pension scheme.

4. The second GR which has an important bearing on this matter is GR NO.NGC-2088/(1652)/vishi-2A dated 4th January, 1989. By this GR the Government has adopted the policy of bringing recognised and no-Grant private colleges on the grant-in-aid basis by stages pursuant to the said GR. Colleges running on no-grant basis were being brought on grant-in-aid-basis by stages. Under the said GR grants were given to non-aided colleges at the rate of 25% 50% and 75% for the 4th 5th and 6th year respectively and from the 7th Year such colleges are given 100% grant.

5. Now turning to the 3rd GR bearing No. NGC-1793/2560/ws-4 dated 22nd November, 1993. It is seen that the object of issuing the said GR was to treat the service put in in non-aided or partly aided colleges as qualifying service for the purpose of computing pensionary benefits. It is noted in the said GR that by GR of 21st July, 1983. Pension has been made applicable to teaching and non-teaching staff of non-agricultural Universities and their affiliated recognised non-Governmental colleges receiving grant. It is noted that there is no provision in the GR of 1983 to hold the services put in recognised no-Grant private Colleges as being admissible for pension benefits. Then reference is made to GR of 1989 and notice has been taken of the fact that the employees of such non-aided colleges will be admissible for pension from the date of such colleges becoming eligible for 100% grant. It is noted that the question of holding services put in such colleges during the period when they were being run either fully or partly on a no-grant basis was under consideration of the Government. Para 3 of the GR then states that the Government has decided that in case of an employee retiring from non-agricultural universities and its affiliated affiliated non-governmental recognised grant-in-aid colleges and who is governed by the pension scheme, the service put in by such an employee in the same college or another college during the period when it was partly or fully non-aided college, shall be deemed qualifying service for the purpose of pension subject to certain conditions mentioned in the GR. We are concerned with condition (A) which reads as follows :

"(A) As regards the non aided colleges in what the employee's service is to be held admissible for pension as above, the said college must have been fully aided on the dates of retirement of such employee."

6. On a plain reading of clause 3 and 3A, it is clearly seen that the intention of the Government is to extend the benefit to employee working in non-aided recognised colleges subject to certain terms and conditions. It was not the intention of the Government to take away the benefit which is granted by the GR of 1983. On the other hand, the object is to extend further benefits even to employees of non-aided institutions. A combined reading of clause 3 with 3A shows that the services rendered by the employee in partly or fully non-aided colleges shall be deemed to be qualifying service provided on the date of the retirement such employee the college has become fully aided. In short the services rendered by an employee in a partly of fully non-aided colleges are also liable to be treated as qualifying service provided such college becomes fully aided college on the date of the retirement of the employee.

7. Coming then to the impugned order, it is seen that clause 3 has been completely misconstrued by the under Secretaty to mean that it imposes a further condition that the employee should retired from a fully aided college. No such condition has been imposed by clause 3 as seen earlier. Therefore. even if the employee has not retired from the fully aided college, his service rendered in the aided and partly aided colleges will have to be taken into consideration for the purpose of determining his Qualifying service under GR of 1983. The benefit conferred on GR of 1983 is not taken away by the GR of 1993. Therefore the petitioner who has rendered 26 years of service in a fully aided college will be entitled to pension even though he has retired from a non-aided college, namely, Royal College of arts science and commerce. However, the services rendered by the petitioner in the Royal College of arts, science and commerce however cannot be taken into consideration as the said college had not become fully aided college at the time of the petitioner's retirement. In fact, this position has been almost accepted in the affidavit of the respondent in favour of the petitioner although it is stated that this is being done as special case. In the result. the impugned order dated 2nd December, 1995 passed by the under Secretary to the Government of Maharashtra is quashed and set aside. The respondents are directed to fix the pension of the petitioner treating the entire service rendered by the petitioner in aided colleges as qualifying service and release the pension from the date of retirement i.e 1st July 1993 within two months from today. It is now well settled that pension is not a bounty or charity but given for the years of dedicated hard work put in by an employee. There was no justification for refusing the pension to the petitioner. Therefore, the respondents are directed to pay interest at the rate of 18% per annum on the amount of pension from the date of his retirement till payment.

certified copy expedited.

*****

## "प्रा.बी.टी.देशमुख अभिनंदन विशेषांक" व एआयफक्टो च्या "चलो दिल्ली" कार्यक्रमाच्या पूर्वतयारीसाठी दौरा व सभांचे आयोजन

| *Sr.No.* | *Date* | *Time* | *Place of the Meeting* | *Meeting will be attended by the teachers of* |
|---|---|---|---|---|
| 1 | 26.2.97 | **09.00 A.M.** | **Mahatma Fule M.V. Warud** | Mahatma Fule M.V. Warud & Arts College Jarud. |
| 2 | 26.2.97 | **11.00 A.M.** | **Bhartiya M.V. Morshi** | Bhartiya M.V. Morshi & Lahoti Science College Morshi. |
| 3 | 26.2.97 | **02.30 P.M.** | **Y.D.V.D. college Tiosa** | Y.D.V.D. college Tiosa & Ayurved College Mozri. |
| 4 | 26.2.97 | **05.00 P.M.** | **Adarsh M.V.Dhamangaon** | Adarsha M.V. Dhamangaon. |
| 5 | 26.2.97 | **07.15 P.M.** | **Mundhada M.V. Chandur Rly.** | all colleges of Chandur Rly. |
| 6 | 27.2.97 | **09.00 A.M.** | **G.S.Tompe M.V.Chandur Bazar** | all Colleges of Chandur Bazar. |
| 7 | 27.2.97 | **11.30 A.M.** | **Jagadamb M.V. Achalpur** | all Colleges of Achalpur & Paratwada. |
| 8 | 27.2.97 | **03.00 P.M.** | **R.S.College Anjangaon Surji** | R.S. College, Anjangaon Surji. |
| 9 | 27.2.97 | **05.00 P.M.** | **J.D.Patil College Daryapur** | J.D.P.C. Daryapur & Arts College, Yeoda |
| 10 | 28.2.97 | **08.00 A.M.** | **Gadge Maharaj M.V. Murtizapur** | Gadge Maharaj M.V. Murtizapur |
| 11 | 28.2.97 | **10.00 A.M.** | **K.N.College Karanja** | K.N.College Karanja & Innani M.V. Karanja. |
| 12 | 28.2.97 | **11.30 A.M.** | **V.N.College Mangrulpir** | V.N.C. Mangrulpir, (ii) S.R.College Wanoja,(III) Arts College, Shendurjana (Adhau) (iv) Arts College, Manora. |
| 13 | 28.2.97 | **03.00 P.M.** | **R.A. College, Washim** | Washim. |
| 14 | 28.2.97 | **06.00 P.M.** | **Dr.Shinha College Patur** | Dr.Shinha College Patur. |
| 15 | 01.3.97 | **09.00 A.M.** | **R.L.T. Science College Akola** | (i) Akola City (ii) G.N. Arts & Com.College Barshi Takali (iii) Arts, Com. & Sci. College, Balapur (iv) S.G.M. College, Borgaon Manju (v) B.L.D. Arts & Sci. College, Pinjar. |
| 16 | 01.3.97 | **01.00 P.M.** | **S.S. College, Akot** | all Colleges of Akot. |
| 17 | 01.3.97 | **03.00 P.M.** | **G.K. College Telhara** | G.K. College Telhara |
| 18 | 02.3.97 | **09.00 A.M.** | **G.B.Murarka College, Shegaon** | (i) Shegaon (ii) Jalgaon Jamod (iii) Warwat Bakal. |
| 19 | 02.3.97 | **10.30 A.M.** | **G.S. College Khamgaon** | all Colleges of Khamgaon. |
| 20 | 02.3.97 | **12.00 Noon.** | **P.M. Arts & Com. College Nandura** | P.M. Arts & Com. College, Nandura |
| 21 | 02.3.97 | **03.00 P.M.** | **Janata Arts & Com. Colle. Malkapur** | Janata College, Malkapur & Arts College, Motala. |
| 22 | 02.3.97 | **05.00 P.M.** | **Jijamata Arts, Com. & Sci. College, Buldhana** | all College of Buldhana. |
| 23 | 03.3.97 | **08.00 A.M.** | **Shivaji Arts & Com. College, Chikhali** | all Colleges of Chikhali. |
| 24 | 03.3.97 | **11.30 A.M.** | **M.E.S.College Mehkar** | (i) Mehkar, (ii) Lonar (iii) Dusarbid (iv) Malegaon. |
| 25 | 04.3.97 | **08.00 A.M.** | **Nehru Arts & Com. College, Ner Parsopant** | all Colleges of Ner Parsopant |
| 26 | 04.3.97 | **09.30 A.M.** | **M.M. College Darwha** | (i) Darwha (ii) Arts & com. College, Bori Arab |
| 27 | 04.3.97 | **11.30 A.M.** | **B.B.Arts College, Digras** | B.B. Arts College, Digras |
| 28 | 04.3.97 | **03.30 P.M.** | **Gawande M.V., Umarkhed** | Gawande M.V., Umarkhed. |
| 29 | 04.3.97 | **06.00 P.M.** | **P.N. College Pusad** | (i) pusad & Sawana. |
| 30 | 05.3.97 | **09.30 A.M.** | **L.T.M.V. Wani** | (i) wani, (ii) Mukutban, (iii) Maregaon. |
| 31 | 05.3.97 | **12.00 Noon.** | **B.D.P. Mahavidyalaya Pandharkawada** | all Colleges of Pandharkawada |
| 32 | 05.3.97 | **03.00 P.M.** | **G.Arts College, Ghatanji** | G.Arts College, Ghatanji. |
| 33 | 05.3.97 | **05.30 P.M.** | **Aney M.V. Yavatmal** | all College of Yavatmal City. |
| 34 | 06.3.97 | **08.30 A.M.** | **Kala Vanijya M.V. Ralegaon** | College of Ralegaon. |
| 35 | 06.3.97 | **10.30 A.M.** | **Indira M.V. Kalamb** | College of Kalamb. |
| 36 | 06.3.97 | **12.00 Noon** | **S.S. Mahavidyalaya, Babhulgaon** | College of Babhulgaon. |

# "प्रा.बी.टी.देशमुख अभिनंदन विशेषांक" व एआयफक्टो च्या "चलो दिल्ली" कार्यक्रमाच्या पूर्वतयारीसाठी दौरा व सभांचे आयोजन

| Sr.No. | Date | Time | Place of the Meeting | Meeting will be attended by the teachers of |
|---|---|---|---|---|
| 1 | 08.3.97 | **04.30 P.M.** | **Yashwant M.V. Wardha,** | 1) All colleges of Wardha. 2) Krishnadas Jajoo, Graminsewa Mahavidyalaya, Pipari 3) Smt. Savita Rani N.J. Arts & Commerce College, Deoli & 4) Y.M. Seloo. |
| 2 | 09.3.97 | **10.00 A.M.** | **S.P. College, Pulgaon** | All Colleges of Pulgaon. |
| 3 | 09.3.97 | **01.30 P.M.** | **Arts & Commerce College, Arvi,** | Arts & Commerce College, Arvi. |
| 4 | 09.3.97 | **03.15 P.M.** | **Hutatma Rashtriya College of Science & Arts Ashti.** | (1) Hutatma Rashtriya College of Science & Arts Ashti. (2) Samartha Mahavidyalaya Ashti. |
| 5 | 09.3.97 | **05.15 P.M.** | **Arts & Commerce College, Karanja** | Arts & Commerce College Karanja. |
| 6 | 10.3.97 | **09.30 A.M.** | **R.S. Bidkar College, Hinganghat** | 1) R.S. Bidkar College, Hinganghat 2) Shikshan Maharshi K.Z. Patil Arts & Commerce College, Samudrapur. 3) Vidya Vikas Arts & Commerce College, Samudrapur. |
| 7 | 10.3.97 | **11.35 A.M.** | **A.N. College, Warora** | 1. A.N. College, 2. Vivekanand College of Education, Warora. |
| 8 | 10.3.97 | **02.00 P.M.** | **Vivekanand Arts & Commerce College, Bhadravati.** | Vivekanand Arts and Commerce College, Bhadravati. |
| 9 | 10.3.97 | **05.00 P.M.** | **S.P. College, Chandrapur** | 1) All Colleges of Chandrapur, 2) G.N. College, Ballarpur. 3) M.Fule College, Ballarpur. |
| 10 | 11.3.97 | **08.00 A.M.** | **Shivaji M.V. Rajura** | Shivaji M.V. Rajura. |
| 11 | 11.3.97 | **11.30 A.M.** | **Raje Dharmarao College, Allapalli.** | Raje Dharmarao College, Allapalli. |
| 12 | 11.3.97 | **01.00 P.M.** | **S.B. College Aheri** | S.B. College Aheri. & Raje Dharmarao Science College, Aheri. |
| 13 | 11.3.97 | **05.15 P.M.** | **K.D.D. Arts & Commerce College, Chamorshi** | K.D.D. Arts & Commerce College Chamorshi. |
| 14 | 11.3.97 | **08.00 P.M.** | **Shivaji M.V. Gadchiroli** | all Colleges of Gadchiroli. |
| 15 | 12.3.97 | **08.30 A.M.** | **M.G. College, Armori** | M.G.College, Armori. |
| 16 | 12.3.97 | **10.30 A.M.** | **N.H.College, Bramhapuri** | all Colleges of Bramhapuri. |
| 17 | 12.3.97 | **12.15 P.M.** | **G.W.Arts & Com College, Nagbhir** | G.W.Arts & Com College, Nagbhir |
| 18 | 12.3.97 | **02.15 P.M.** | **Sarvodaya M.V.Sindewahi** | Sarvodaya M.V. Sindewahi. |
| 19 | 12.3.97 | **03.45 P.M.** | **Karmavir M.V. Mul** | Karmavir M.V. Mul. |
| 20 | 12.3.97 | **06.15 P.M.** | **Dnyanesh M.V. Nawargaon** | Dnyanesh M.V. Nawargaon |
| 21 | 12.3.97 | **07.35 P.M.** | **R.T.College, Chimur** | R.T.College, Chimur & Social Work College. |
| 22 | 13.3.97 | **09.40 A.M.** | **Nabira M.V. Katol** | Nabira M.V. Katol & other Colleges of katol |
| 23 | 13.3.97 | **11.30 A.M.** | **Arvindbabu M.V. Bharsingi** | Arvindbabu M.V. Bharsingi. |
| 24 | 13.3.97 | **02.45 P.M.** | **P.N. College, Narkhed** | P.N. College, Narkhed. |
| 25 | 13.3.97 | **06.00 P.M.** | **Arts & Com. College Saoner** | all colleges of Saoner |
| 26 | 14.3.97 | **08.30 A.M.** | **Arts & Com. College, Mauda** | Arts & Commerce College, Mauda. |
| 27 | 14.3.97 | **10.00 A.M.** | **J.M. Patel College, Bhandara** | all Colleges of Bhandara. |
| 28 | 14.3.97 | **01.15 P.M.** | **S.N. Mor College, Tumsar** | S.N. Mor College, Tumsar. |
| 29 | 14.3.97 | **03.30 P.M.** | **C.J.Patel College, Tirora** | C.J.Patel College, Tirora. |
| 30 | 14.3.97 | **06.00 P.M.** | **N.M.D. College, Gondia** | All Colleges of Gondia. |
| 31 | 15.3.97 | **08.00 A.M.** | **B.M. College, Amgaon** | B.M. College, Amgaon |
| 32 | 15.3.97 | **10.00 A.M.** | **M.B. Patel College, Deori** | M.B. Patel College, Deori. |
| 33 | 15.3.97 | **11.00 A.M.** | **M.B. Patel College, Sakoli** | M.B. Patel College, Sakoli |
| 34 | 15.3.97 | **01.15 P.M.** | **S.S. Jaiswal Arts & Commerce College, (Mor) Arjuni** | S.S. Jaiswal Arts & Commerce College, (Mor) Arjuni. |
| 35 | 15.3.97 | **03.30 P.M.** | **Samarth M.V. Lakhani** | Samartha M.V. Lakhani |
| 36 | 15.3.97 | **06.30 P.M.** | **N.T. College, Ramtek** | all Colleges of Ramtek. |
| 37 | 16.3.97 | **11.00 A.M.** | **G.S. College of Commerce Nagpur** | all Colleges of Nagpur, Kamptee, Wanadongri, Hingana, Wadi,Umred and Paoni. |

## BUDGET FOR THE FINANCIAL YEAR - 1997-1998

OFFICIAL ACCOUNTING YEAR OF THE TRUST : 1997-1998 (AS PER SCHEDULE VII-A OF THE B.P.T.A. 1950)

***Name of the Trust*** **: NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION.**

Regn. of the Trust : B.P.T.A. Regn. No. F-1594 & Soc. Regn. Act. Regn. No. MAH-15-73(NGP)

| ESTIMATED RECEIPTS | RS. P. | ESTIMATED DISBURSEMENTS | Rs. P |
|---|---|---|---|
| **I. OPENING BALANCE :** | | **A) NON-RECURRING :** | |
| i) Cash in hand ... ... | ... .. | i) Major Repairs or rebuilding | |
| ii) Cash in Bank ... ... | 15000 00 | of the assets etc. ... ... | ... .. |
| | | ii) Net purchase of immovable property | ... .. |
| **II. ESTIMATED RECEIPTS :** | | **B) RECURRING** : | |
| **(A) NON RECURRING** | | i) Rents, rates taxes etc. ... ... | 2,000 00 |
| i) Ordinary Donations to be | | ii) Administrative Expenses ... ... | ... .. |
| received for specific earmarked | | a) Stationery, Typing , | |
| objects (permanent subscription | | Cyclostyling & Printing . ... .. | 80,000 00 |
| to NUTA Bulletin) ... ... | ... .. | b) Travelling Expenses ... ... | 20,000 00 |
| ii) Ordinary Donations ... | ... .. | c) Postage and Telephone. .. | 10,000 00 |
| | | d) Misc. expenses ... ... | 4,000 00 |
| **(B) RECURRING** : | | e) Bank commission ... ... | 400 00 |
| i ) Rent etc. on immovable property | ... .. | f) Legal Expenses ... | 1000 00 |
| ii) Interest on Fixed Deposits | | g) Audit fees ... ... | 1500 00 |
| iii) Dividend shares etc ... | 140000 00 | h) Affiliation fees ... ... | |
| iv) Income from Agri. land ... | ... .. | i) MFUCTO ... | 4000 00 |
| v) Other revenue Receipt ... | ... .. | ii) AIFUCTO ... ... | 1600 00 |
| vi) Legal Aid Fund ... | ... .. | iii) Contribution to public | |
| | | trust\ admn. Fund | ... .. |
| **III. REALISATION FROM** | | iii) Payment of Salaries... ... | 2,400 00 |
| **DISPOSAL OF ASSETS** : | ... .. | iv) Transfer of Depreciation Fund | |
| | | v) Special & Current repairs of building | |
| **IV EXCESS OF EXPENDITURE** | | Furniture etc .... .... | 6,000 00 |
| **OVER INCOME :** ... | ... .. | vi) Excess of income over expenditure | 22,100.00 |
| **TOTAL Rs.** | **1,55,000 00** | **TOTAL Rs.** | **1,55,000 00** |

**NOTE** : Estimated enrolment of members during the year is expected to be 5. On this account the association will receive an estimated amount of Rs. 10,005/- However this amount cannot be included in the estimated receipts because this amount is to be invested in fixed deposit receipts or any other Govt. Securities as per Artcle III of the Constitution
**Sd. S.A.Tiwari, Treasurer NUTA**

## Nagpur University Teachers' Association
## MEETING NOTICE : 1

Dated : 20th February 1997

From :
**Prof. E. H. KATHALE**
Secretary, NUTA
N-162 Reshim Bag, Nagpur 444 009

To,
All the members of the
Nagpur University Teachers' Association

Dear members,

I have the honour to inform you that General Body meeting of the Nagpur University Teachers' Association will be held at 9.00 A.M. on the Day and the Date mentioned below.

2. If you propose to move any resolution for the consideration of the General Body, you are requested to send such resolution to me, with a copy to Prof. B.T.Deshmukh, President NUTA, No. 3, Subodh Colony, Near Vidarbha Mahavidyalaya, Amravati 444604 within a period of 10 days from the date of the posting of this Bulletin.

3. It will not be possible to include in the agenda, resolutions received after the due date. So please make it convenient to send such resolutions, if any, within the stipulated time. The place of the meeting will be intimated to you along with the agenda.

Thanking you.

Yours faithfully
**Sd/- E. H. Kathale**
Secretary, NUTA.

***Time, Day and Date of the Meeting:***

***9.00 A.M. on Sunday, the***

***18th May, 1997***

***Statement about ownership and other particulars of NUTA Bulletin as required under Rule 8 of the Registration of News papers (central) Rules, 1956***

**FORM : IV**

**Declaration in respect of NUTA Bulletin**

*(as per Rule 8)*

**1.***Place of Publication :*
Phundkar Bhavan, Behind Jain Hostel, Maltekadi Road, Amravati-444 601.

**2.** *Periodicity of its Publication :*
Fortnightly

**3**. *Printer's Name, Nationality and Address :*
A.G.Somwanshi, Shankar Nagar, Amravati.

**4.** *Publisher's Name Nationality and Address:*
Prof. V.K. Pande,7,Yeshwant Appartments Laxmi Nagar,WARDHA-442 001.

**5.** *Editor's Name, Nationality and Address :*
A.G.Somwanshi, Shankar Nagar, Amravati.

**6.** *Names and Addressess of Individuals who own the Newspaper and Partners or Share holders holding more than one percent of Total Capital :*
Nagpur University Teachers' Association .

I. A.G.Somwanshi hereby declare that the particulars given above are true to the best of my knowledge and belief

Dated : 20-2-1997 *sd / A.G.Somwanshi*
Publisher and Editor
NUTA Bulletin,

# “नुटा बुलेटीन” चा “प्रा.बी.टी.देशमुख अभिनंदन विशेषांक”

## संघटनेचे सचिव प्रा.एकनाथ कठाळे यांचे निवेदन

१. राष्ट्रकुल संसदिय मंडळाच्या वतीने संघटनेचे अध्यक्ष प्रा.बी.टी.देशमुख यांना “उत्कृष्ट संसदपटू” हा पुरस्कार देऊन गौरवान्वित करण्यात आले, ही आपणा सर्वासाठी अत्यंत आनंदाची गोष्ट आहे. प्रा.बी.टी.देशमुख यांचा हा जो गौरव झाला त्याबद्दलचा आनंद व्यक्त करण्यासाठीची पद्धती, प्रकार व स्वरूप याबाबत तपशीलवार विचार केल्यानंतर नुटाच्या कार्यकारी मंडळाने नुटा बुलेटीनचा “प्रा.बी.टी.देशमुख अभिनंदन विशेषांक” प्रकाशित करण्याचा निर्णय घेतला असून असा प्रकाशन समारंभ **रविवार, दिनांक १८ मे १९९७ रोजी सकाळी १०.३० वाजता भारतीय महाविद्यालय अमरावती** येथे आयोजित करण्याचे ठरविले आहे.

२. विद्यापीठ व महाविद्यालयीन, कनिष्ठ महाविद्यालयीन, व्यावसायिक अभ्यासक्रमाचे, माध्यमिक जिल्हा परिषद, नगरपरिषदेतील, आयुर्वेद महाविद्यालयातील, समाजकार्य महाविद्यालयातील तसेच पंजाबराव कृषी विद्यापीठातील, व त्यांच्याशी संलग्न महाविद्यालयातील, शासकीय महाविद्यालयातील, रुरल इंस्टिट्युटमध्ये काम करणारे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी आणि पदवीधर प्राथमिक व इतर प्राथमिक, ग्रंथपाल व शारिरीक शिक्षण शिक्षक, जनपदकालीन प्राथमिक शिक्षक, मुख्याध्यापक यांचे अनेक प्रश्न त्यांनी सभागृहात मांडलेत व त्यातील कितीतरी प्रश्न यशस्वीपणे सोडवून घेतले. वैद्यकीय महाविद्यालयातील जागांच्या समन्यायी वाटपाबाबत होत असलेला भेदभाव किंवा अकोला पूर नियंत्रण योजनेच्या प्रश्नावर त्यांनी सभागृहात घडवून आणलेल्या चर्चा व मिळविलेले यश विलोभनिय आहे.

३. विदर्भातील अनुशेष विषयक एकेक प्रश्न हाताशी घेऊन ते सोडविण्याचे सभागृहात त्यांनी केलेले प्रयत्न अत्यंत अभिनंदनीय ठरले आहेत. पाणी पुरवठा योजनेच्या आर्थिक आकृतीबंधामध्ये १० टक्के लोकवर्गणीची अट असल्यामुळे बलवान भागांच्या योजना तडीला जातात व अप्रगत विभाग मागे राहतात हे लक्षात घेऊन अमरावती पाणी पुरवठा योजनेतून दहा टक्क्याची अट काढून टाकण्यासाठी झालेल्या लोक चळवळीत प्रा. बी.टी. देशमुख यांचा वाटा मोठा होता. पुढे सर्व क वर्ग नगरपालिकांसाठी ही अट काढून टाकण्यात आली. या लढ्यामध्ये विधानपरिषदेत अमरावतीकरांना सोबत करणाऱ्या त्यावेळच्या एका विधानपरिषद सदस्याने पुढे मुख्यमंत्री झाल्यावर अमरावती शहराच्या वेळी आलेला अनुभव लक्षात घेवून “१० टक्के लोकवर्गणी न भरल्यामुळे अनेक योजना पूर्ण होत नाहीत. म्हणून माझ्या शासनाने अशा प्रकारचा विचार केलेला आहे की १० टक्के लोकवर्गणीची अट ही पूर्णपणे काढून टाकण्यात यावी.” असे विधानसभेत जाहीर केले व त्याप्रमाणे शासननिर्णयही निर्गमित झाला आहे. मा. मुख्यमंत्री श्री. मनोहर जोशी यांनी २० जुलै १९९५ रोजी नगरविकास विभागाच्या मागण्यावरील चर्चेला उत्तर देतांना विधानसभेत वरील निर्णय घोषित करतांना पुढील शब्दात उल्लेख केला “अनेक ठिकाणी ही लोकवर्गणी भरली जात नसल्यामुळे ही लोकवर्गणी भरण्याची नगरपालिकांची क्षमता, ताकद नसल्यामुळे या योजना सुरु झाल्या नाहीत. या योजना फक्त कागदावर दिसून येत आहेत...... अमरावती महापालिकेचा त्याला अपवाद आहे. विधानपरिषद सदस्य श्री. बी.टी.देशमुख यांनी याबाबत अतिशय तर्कशुद्ध माहिती दिली आणि त्यांचे आरग्युमेंट शासनाला मान्य झाले. मी त्यावेळी सभागृहामध्ये उपस्थित होतो. तेव्हा फक्त अमरावती नगरपालिकेला अपवाद करण्यात आला आहे. गेल्या ४/५ महिन्यामध्ये अनेक नगरपालिकांनी मला विनंती केली.” दहा टक्के लोकवर्गणीची अट महाराष्ट्रामध्ये आता इतिहासजमा झालेली आहे. हा इतिहास घडविण्यातील बी.टीं. चा वाटा लक्षणीय आहे. विदर्भातील बहुतेक शहरे, अमरावती महसुल विभागाच्या अमरावती, अकोला, बुलढाणा जिल्ह्यातील सर्वच शहरे व यवतमाळ जिल्ह्यातील सात शहरे नागरी पाणी पुरवठ्याच्या अनुशेषात आहेत. या अनुशेषाच्या निर्मुलनार्थ सभागृहात त्यानी उभी केलेली लढाई प्रशंसनियच नव्हे तर यशस्वीहि ठरली.

विधानपरिषद सदस्य या नात्याने मिळालेल्या आयुधांचा वापर करून एखाद्या संशोधकाच्या जिद्दीने जलसिंचन अनुशेषाची आकडेवारी त्यांनी मिळविली. दांडेकर समितीने “विदर्भाचा १९८२ चा जलसिंचनाचा अनुशेष ५२७ कोटी रुपयांचा ठरविला होता. तो जून १९९० मध्ये १५५० कोटी रुपयांचा झाला आहे.” हा त्यांनी काढलेला निष्कर्ष अचंबित करणारा त्यावेळी (१९९२) वाटला तरी तो बिनचूक होता हे आता उघड झाले आहे.

४. महाराष्ट्र विधानपरिषदेच्या सुवर्ण महोत्सवी वर्षात विधानमंडळ सचिवालयाचे त्यावेळचे (१९८७) सचिव श्री. व्ही.एम. सुब्रम्हण्यम यांनी लिहिलेल्या “Fifty years of Legislative Council in Maharashtra” या पुस्तकात पृष्ठ ११४ वर पुढील उल्लेख आहे."Similarly, in view of the vocal representation of the 'Teachers' prolonged and protracted discussions took place in the Council about the pay scale and emoluments and pensions of the teaching staff before it led to some satisfactory solution. It will not be possible to narrate here, detail by detail, how the matter lingered for nearly 4 to 5 years in the Council. But it **will be an interesting and intelligent exercise if a researcher were to proceed on a documentation of the entire matter - the origination of a question, the reply given by Government, the pursuit of the matter through almost every session for nearly 5 years (1982-1987) by means of questions,** the inconsistencies in the replies, the members challenging the Government on the 'facts' given by it, successive Ministers of State for Education (and sometimes Ministers too) being cornered with information relating to earlier assurances and even Government Orders and Circulars about which they were unaware, the assurances given and noncompliance thereof which provided further handle to the members and finally the culmination of the matter with the Government finding an acceptable solution. Those who might have watched the entire proceedings might have understood how persevering Shri. B.T.Deshmukh, M.L.C., was among other members who pursued the question, whenever he used to wave a sheaf of papers in the Council to impress on the Chairman that he had all the documents readily with him to successfully challenge the accuracy and correctness of the information given by the Government."

५. विधानमंडळाचे सचिव १९८७ साली असे लिहून ठेवतात की, “it **will be an interesting and intelligent exercise if a researcher were to proceed on a documentation**” हे डॉक्युमेंटेशन तपशिलवारपणे आज आपण करू शकत नाही हे खरे असले तरी निदान त्याच्या संक्षिप्त नोंदी समग्रपणे सुचीबद्द करायला काय हरकत आहे? असा विचार करुन कार्यकारी मंडळाने हा निर्णय घेतला आहे. प्रा.बी.टी.देशमुख यांचा विधानपरिषदेतील विविध विषयावरील सहभाग व त्यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांची अद्यावत “एकत्रित सूची” व “विषय निहाय सूची” हा या विशेषांकातील मुख्य मजकूर राहील.

६. १९७३ चे विघातक कॉलेज कोड हाणून पाडणे, परिनियम ५३ सारखी विधायक व्यवस्था प्रस्थापीत करणे, १९७४ च्या नव्या विद्यापीठ कायद्यात विधायक सुधारणा घडवून आणणे, नियमित व वेळेवर वेतन मिळण्यासाठी नेमलेल्या समितीमध्ये सदस्य म्हणून प्रभावी काम करून ती व्यवस्था लागू व्हावी म्हणून जिव ओतणे, पेन्शन योजना

लागू करवून घेणे, वैद्यकिय खर्चाच्या प्रतिपूर्तीची सुविधा व रजाप्रवास सवलत तेंव्हाची व आताची लागू होणे, या ताज्या गोष्टी आहेत. प्राध्यापक संघटनेनी मिळविलेली वरिष्ठ श्रेणी व निवडश्रेणी त्यांच्या पदरात पडू न देण्याची नोकरशाहीची सारी टोकाची कारस्थाने आवश्यक त्या सर्व प्रकारच्या सांसदिय आयुधांचा वापर करून सभागृहाच्या माध्यमातून बी.टी.नी हाणून पाडली. "शासन निर्णयाने तीन वेतनश्रेणी दिल्या असल्या तरी तुर्त २२००-४००० मध्येच सर्वांची स्थान निश्चिती करावयाची आहे." हे प्रशासन अधिकारी उच्च शिक्षण अनुदान यांचे परिपत्रक किंवा "निवडसमितीसमोर हजर झाल्याशिवाय निवडश्रेणी मिळणार नाही" हे सहसंचालक उच्च शिक्षण, यांचे आदेश बिनचूक आयुधांचा वापर करून मागे घेण्यास शासनाला त्यांनी भाग पाडले. १९८६ ची नविन वेतनश्रेणी लागू होतांना वरिष्ठ श्रेणी व निवडश्रेणी न देण्याचा निर्धार करून बसलेल्या उच्च शिक्षण खात्याची "ती" योजना पार धुळीस मिळविण्यासाठी बी.टी.नी जिवाचे रान केले हे आपण सर्वांनी पाहिले आहे. गेल्या २५ वर्षात महाराष्ट्रात झालेल्या प्राध्यापकांच्या प्रत्येक आंदोलनात बी.टी. नी "अभ्यासपूर्ण नेतृत्व" पुरविले हे त्यांना राजकीय दृष्ट्या विरोध करणारांनी सुद्धा मुक्तकंठाने मान्य केले आहे.

७. अतिरिक्त शिक्षकांना संरक्षण मिळावे यासाठी जबरदस्तपणे त्यांनी केलेले यशस्वी प्रयत्न, विद्यापीठ कायद्यामध्ये विधायक बदल व्हावे म्हणून विधानमंडळाच्या संयुक्त समितीचे सदस्य म्हणून त्यांनी दिलेली झुंज, ही आजहि आपल्या डोळ्यापुढे आहे. ठरलेल्या कराराचा भंग करून "नेट सेट" च्या अटी मोडतोड करून या व्यवसायामध्ये नव्याने आलेल्या प्राध्यापकांची दमछाक करण्याचे राज्य शासनाचे कारस्थान त्यांनी ताकदीने मोडून काढले. "नेट पास होण्यासाठी मुदत वाढवून देण्याची" झोळी अनेकांनी पसरविली असतांना "ही मुदत वाढवून देण्याचा प्रश्नच नाही कराराप्रमाणे व कायद्याप्रमाणे "नेट सेट" ही शिक्षकांना लागूच नाही ती उमेदवारांना लागू आहे" अशी ठाम भूमिका एकटे बी.टी. मांडत होते. ती सुद्धा सभागृहामध्ये. हा रेकॉर्ड आहे. करारात व कायद्यात असलेल्या "शिक्षक" व "उमेदवार" या शब्दाच्या ज्या परिभाषा बी.टीं.नी समोर मांडल्या त्याचा विरोध शासनाला करता आला नाही. उलट ती अट काढून टाकण्याचा २२ डिसेंबर १९९५ चा शासननिर्णय शेवटी शासनाला निर्गमित करावा लागला. या शासन निर्णयावरील संघटनेची भूमिका निश्चित करणारा ठराव तयार करण्याचे काम महाराष्ट्र प्राध्यापक संघाने बी.टीं वर सोपविले होते व "प्रतिक्रीयेच्या या ठरावातील शब्दरचना" एवढी बिनचूक आहे की त्याचा प्रतिवाद शासनाला अजूनहि करता आला नाही.

८. एकत्रित सुची व विषयवार सूची व इतर मजकूर समाविष्ट असलेला हा विशेषांक बराच मोठा होण्याची शक्यता आहे. यासाठी फार मोठे अर्थबळ उभे करावे लागेल. याची कार्यकारी मंडळाला जाणिव असून त्याचा काळजीपूर्वक विचारहि करण्यात आला आहे. छपाई व कागदाचा वाढता खर्च लक्षात घेता आपल्या नियमित बुलेटीनसाठी आपला नियमित निधी जेमतेम पुरतो अशी आपली संघटनात्मक स्थिती आहे. यापूर्वी विकास विषयक प्रश्नावर आपण ३-४ विशेषांक काढले आहेत. संघटनेच्या निधीतून त्या अंकासाठी खर्च करणे आपणाला शक्य नव्हते व ते करू नये असा धोरणात्मक निर्णयहि कार्यकारी मंडळाने घेतला होता. त्यावेळी जाहिराती मिळवून विकासविषयक विशेषांक काढण्यात आले. त्या विशेषांकाचे प्रकाशन चांगलेच यशस्वी झाले. प्रकाशनोत्तर उरलेल्या उत्पन्नातून उत्तम अशा प्रकारची "प्रकाशनपूर्व संगणक यंत्रणा" आपल्या संघटनेच्या कार्यालयात बसविण्यात आली. प्रा.बी.टी.देशमुख अभिनंदन विशेषांकासाठीचे अर्थबळ आपले आपणच उभे करू असे ठरविण्यात आले असून त्या कामासाठी विद्यापीठीय व महाविद्यालय शिक्षक, कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक, माध्यमिक शिक्षक, अनुशेष निर्मूलनाच्या कामामध्ये जिव्हाळा असलेल्या विविध व्यक्तीशी संपर्क करावा व त्यांच्या स्वेच्छाधीन सहभागातून हे अर्थबळ उभे करावे असा निर्णय कार्यकारी मंडळाने घेतला आहे. प्रत्येकाने या कामी ५०० रूपये एवढा सहभाग द्यावा अशी विनंती याबाबत करण्यात येत आहे.

**एकनाथ कठाळे**
**सचिव 'नुटा'**

*******

**IN THE HIGH COURT OF JUDICATURE, APPELLATE SIDE, BOMBAY.**
***WRIT PETITION NO. 6140 OF 1996***

**1.** Shri. Balasaheb Bhimrao Deshmukh, and ors .. ***Petitioners*** Represented by Shri N.P. Dalvi Adv. **Versus** 1. The State of Maharashtra and ors .. ***Respondents***

To

**1.** The State of Maharashtra to be served on the Additional Govt. pleader, High Court, A.S., Bombay-400 032. **2.** The Director of Education, Higher Education Central Office, Pune. **4.** The Principal, D.A.V.College of Commerce, Solapur. **5.** The Principal, K.B.P.College, Pandharpur, Dist. Solapur. **6.** The Principal, Sangameshwar College, Solapur. **7.** The principal, D.B.F.College of Arts and Science, Solapur.

Whereas the abovenamed petitioners have presented a petition to this High Court of Judicature at Bombay, praying that (c) pending the hearing and final disposal of this petition, the respondent No. 1,2,4,5,6 and 7 be restrained by an order and injunction of this Honble Court from giving any effect to the impugned order dated 4th July 1994 and /or the impugned letter dated 24th November, 1996 and the said respondents be further restrained from either effecting any deduction from the salary of the petitioner or to recover any amount from their respective salaries, as stated in the accompanying copy of petition,

And whereas upon hearing Shri N.P.Dalvi Adv. for the petitioners and Shri. V.M. Parshurami AGP for R.Nos 1 and 2, the Court

**(Coram : A.V.Savant and D.K.Deshmukh, JJ)**
**passes the following order :-**

"Rule 2. To be heard with writ petition No. 4656/94- 3. Ad-interim relief in terms of prayer clause (c)".

It is hereby accordingly ordered that you, your servants and your agents, be and are hereby restrained from giving any effect to the impugned order dated 4.7.1994, passed by the under Secretary, Govt of Maharashtra, Mantralaya Mumbai, bearing No. NGC-1294/(2739) Vashi-4 and / or the impugned letter dated 24.11.1996 issued by the director of education, Kolhapur division, Kolhapur, bearing outward No. sasan/Upi/Kovi/vali-2/96-97 and further restrained from either effecting any deduction from the salary of the petitioners (i.e. 1 Shri. Balasaheb Bhimrao Deshmukh, 2. Shri. Dattatraya Nivruti Gore, 3 Shri. Vishsanath Ambadas Swami and 4 Shri. Bhairu Kollappa Pujari) or to recover any amount from their respective salaries, pending the hearing and final disposal of this writ petition or until further orders.

Withness Shri M.B.Shah, Chief Justice at Bombay, aforesaid this 16th day of December, 1996.

By the Court,

Assistant Registrar,
(Civil)
The 18th day of December, 1996.

अमरावती विद्यापीठ गॅझेट : भाग एक : शनिवार, दिनांक ३० नोव्हेंबर १९९६ : असाधारण : पृष्ठ ६२-६३

**अध्यादेश क्रमांक : १६/१९९६**

# कार्यभार कमी झाल्यामुळे अतिरिक्त होणाऱ्या शिक्षकांना अन्य संलग्नित महाविद्यालयाच्या सेवेत सामावून घेण्यासाठी अनुसरावयाच्या कार्यपद्धतीचा अध्यादेश, १९९६

कार्यभार कमी झाल्यामुळे अतिरिक्त ठरणाऱ्या कायम शिक्षकांना महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ च्या कलम ८ (३) मध्ये सेवेत संरक्षण देऊन सामावून घेण्याबाबतची तरतूद आहे. या संदर्भात कार्यपद्धतीचा अध्यादेश तयार करण्यासाठी व्यवस्थापन परिषदेने दिनांक ८.१०.९५ च्या बैठकीत विषय क्र. ७१ व्दारे एक समिती स्थापन केली व समितीकडे अतिरिक्त शिक्षकांना विद्यापीठ परिक्षेत्रातील इतर संलग्नित महाविद्यालयात सामावून घेण्यासाठीच्या कार्यपद्धतीचा अध्यादेश तयार करण्याची बाब सोपविली. समितीच्या असे लक्षात आले की, शिक्षकाला अतिरिक्त ठरविण्याच्या कार्यपद्धतीचे नियम विद्यापीठ स्तरावर असणे आवश्यक आहे. त्यानंतर त्यातच ठरविलेल्या पद्धतीनुसार अतिरिक्त ठरलेल्या शिक्षकांना सेवेत सामावून घेण्याची तरतुद सुद्धा अंतर्भूत असणे आवश्यक आहे. म्हणून विद्यार्थी संख्या कमी झाल्यामुळे किंवा तुकड्या कमी झाल्यामुळे किंवा अन्य कारणांमुळे कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात अतिरिक्त ठरणाऱ्या निर्बाध रिक्त पदावर कायम झालेल्या अधिव्याख्यात्यांना त्याच व्यवस्थापनाच्या किंवा ते शक्य न झाल्यास अन्य व्यवस्थापनाच्या इतर महाविद्यालयात सामावून घेण्यासाठी पुढील प्रमाणे कार्यवाही निश्चित करणारा पुढील आध्यादेश मान्य करण्यात येत आहे :

१. या अध्यादेशाला "कार्यभार कमी झाल्यामुळे अतिरिक्त होणाऱ्या शिक्षकांना अन्य संलग्नित महाविद्यालयाच्या सेवेत सामावून घेण्यासाठी अनुसरावयाच्या कार्यपद्धतीचा अध्यादेश १९९६" असे संबोधिले जाईल.

२. व्यवस्थापन परिषदेने मान्य केल्यानंतर हा अध्यादेश अमलात येयील.

३. वेगळा संदर्भ नसेल तर :-

१. समिती म्हणजे व्यवस्थापन परिषदेने दिनांक ८.१०.९५ च्या बैठकीत विषय क्र. ७१ व्दारे नेमलेली समिती. (४/१९९५)

२. 'अतिरिक्त शिक्षक' म्हणजे ज्या शिक्षकाला त्याच्या विषयाचा कार्यभार उपलब्ध नसेल व समितीने/व्यवस्थापन परिषदेने अतिरिक्त ठरल्याचा निर्णय दिला असेल असा शिक्षक.

४. संबंधित महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी अतिरिक्त शिक्षकांबद्दलची माहिती प्रपत्र 'अ' मध्ये विद्यापीठाकडे पाठवावी (प्रपत्र 'अ' सोबत जोडले आहे)

५. महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी अतिरिक्त ठरलेल्या प्रत्येक शिक्षकासाठी स्वतंत्र प्रपत्र वापरावे. एकाच प्रपत्रात एकापेक्षा जास्त अतिरिक्त शिक्षकांची माहिती कळवू नये.

६. अतिरिक्त ठरणाऱ्या प्रत्येक शिक्षकाची माहिती पाठवितांना संबंधित शिक्षकाला माहितीच्या प्रपत्राची प्रत देऊन प्रपत्रावर ते मिळाल्याबद्दल त्याची स्वाक्षरी घ्यावी. प्रपत्र मिळाल्याबद्दल पोच म्हणून स्वाक्षरी असलेले मुळ प्रपत्र विद्यापीठाकडे पाठवावे.

७. शिक्षक अतिरिक्त असल्याबाबतच्या प्रपत्राच्या विद्यापीठाकडे सादर केलेल्या प्रतीवर, प्रत संबंधित शिक्षकाला मिळाल्याचे नमूद नसल्यास ते प्रपत्र रद्द समजले जाईल.

८. कार्यभाराविषयी किंवा अतिरिक्त ठरविण्याच्या कोणत्याही मुद्याविषयी शिक्षकाची तक्रार असल्यास त्याने त्या बाबत आपली तक्रार प्रपत्र मिळाल्यापासून १५ दिवसांत विद्यापीठाकडे पाठवावी.

परंतु असे की अशा तक्रारीची मुळ प्रत थेट विद्यापीठाकडे दाखल करीत असतांना तक्रारीची दुसरी प्रत त्याचवेळी सदरहू शिक्षकाने आपल्या प्राचार्यामार्फत पाठविली पाहिजे. तक्रारीची अशी दुसरी प्रत प्राचार्यांना प्राप्त झाल्यानंतरच्या १० दिवसात सदरहू तक्रार अर्जामध्ये नमूद केलेल्या मुद्याविषयी आपले परिच्छेद निहाय अभिप्राय नमूद असलेल्या स्वतंत्र निवेदनासह, तक्रारीची ही दुसरी प्रत प्राचार्यांनी विद्यापीठाकडे पाठवावी.

९. विद्यापीठात प्राप्त झालेल्या अशा सर्व प्रपत्रांची माहिती समितीसमोर ठेवली जाईल. परिच्छेद ८ प्रमाणे तक्रार आली नसल्यास सदरहू शिक्षकाचे प्रकरण अतिरिक्त शिक्षकांच्या नोंद वहीत नोंदविण्यास योग्य आहे असा निर्णय समिती देईल.

१०. तक्रार असल्यास मुळ तक्रार, या तक्रारीवर परिच्छेद निहाय अभिप्राय देणारे प्राचार्यांचे निवेदन व इतर कागदपत्रे विचारात घेवून आवश्यकता वाटल्यास संबंधितांना प्रत्यक्ष साक्षीला बोलावून व त्यांची निवेदने नोंदवून सदरहू शिक्षक अतिरिक्त शिक्षक आहे किंवा नाही याबाबतचा आपला अहवाल तयार करील व तो मान्यतेसाठी व्यवस्थापन परिषदेसमोर ठेविल. याबाबत व्यवस्थापन परिषदेचा निर्णय अंतिम असेल. या निर्णयाने उक्त शिक्षकास अतिरिक्त शिक्षक ठरविल्यास तशी नोंद नोंदवहीमध्ये घेतली जाईल.

११. विद्यापीठात अतिरिक्त ठरणाऱ्या प्राध्यापकांच्या नोंदी घेण्याच्या प्रयोजनासाठी एक नोंदवही (रजिस्टर) ठेवण्यात येयील त्यात खालील माहिती असेल.

१. अ.क्र. २. महाविद्यालयाचे नांव ३. शिक्षकाचे नांव, शैक्षणिक पात्रता ४. विषय ५. एकूण सेवा काळ, रुजू दिनांकासह ६. संबंधित शिक्षकाला प्रपत्र मिळाल्याची तारीख ७. तक्रार नोंदविल्याची तारीख ८. समितीचा निर्णय ९. या निर्णयाची तारीख १०. व्यवस्थापन परिषदेचा निर्णय ११. निर्णयाची तारीख १२. शेरा

१२. अतिरिक्त ठरणाऱ्या अधिव्याख्यात्यांची परिच्छेद ११ मध्ये उल्लेखित रजिस्टरमध्ये नोंद ठेवल्या जाईल.

१३. संबंधित विषयाच्या शिक्षकाची जागा संलग्नित महाविद्यालयात रिक्त होताच अतिरिक्त शिक्षकाच्या नोंदवहीतील शिक्षकाला त्या महाविद्यालयाच्या सेवेत सामावून घेण्याचे आदेश दिले जातील.

१४. ज्या विषयाच्या बाबतीत अतिरिक्त शिक्षक उपलब्ध असतील तेथे शिक्षक नेमणुकीसाठीच्या जाहिरातीला विद्यापीठ मान्यता देणार नाही.

१५. अतिरिक्त शिक्षकाला त्याच व्यवस्थापनाच्या किंवा ते शक्य नसल्यास अन्य व्यवस्थापनाच्या इतर महाविद्यालयात सामावून घेण्यासाठी विद्यापीठ आदेश देईल. एखाद्या विषयातील एखाद्या शिक्षकाला विद्यापीठाच्या परिक्षेत्रामध्ये सामावून घेण्याच्या प्रयोजनासाठी जागा नाही असे लक्षात आले तर त्याचे नाव इतर विद्यापीठामध्ये सामावून घेण्याच्या प्रयोजनासाठी संचालक (उच्च शिक्षण) यांच्याकडे पाठविण्यात येईल.

परंतु आणखी असे की, उच्च शिक्षण संचालकाच्या स्तरावर रिक्त पदावर सामावून घेण्याबाबतचे आदेश निर्गमित झालेले असतील अशा अधिव्याख्यात्याच्या नियुक्तीस पूर्वी संबंधीत विद्यापीठाने मान्यता दिली असल्यास त्यांना परत नव्याने मान्यता देण्याची आवश्यकता राहणार नाही

१६. अतिरिक्त शिक्षकांच्या नोंदवहीतील शिक्षकांना सामावून घेतांना समितीने ज्यांच्या बाबतीत "अतिरिक्त शिक्षक" ठरल्याचा निर्णय नोंदवहीत नमूद केलेला आहे अशा विषयाच्या जेष्ठ शिक्षकाला सामावून घेतांना प्राथम्य दिले जाईल.

१७. महाविद्यालयातील एखादा शिक्षक तक्रार निवारण समितीने/कोर्टाने अतिरिक्त ठरविला असेल तर त्याबद्दलची माहिती प्राचार्यांनी विद्यापीठाकडे पाठवावी.

१८. महाविद्यालयात कमी करण्यांत आलेले पद पुनर्जिवित करण्यांत आले किंवा त्याच विषयासाठी जादा पदे निर्माण करण्यात आली तर संबंधित महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी ह्या बाबतची सूचना पूर्वी अतिरिक्त ठरविलेल्या व दुसऱ्या संलग्नित महाविद्यालयात सामावून घेतलेल्या शिक्षकाला उद्देशून नोंदणीकृत पोच देय डाकेने पत्र पाठवून पुन्हा पूर्वीच्या महाविद्यालयाच्या सेवेत येण्यास प्रथम संधी द्यावी व त्याची आगावू प्रत त्या महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी विद्यापीठाला पाठवावी.

परंतु असे की, अतिरिक्त शिक्षक म्हणून कमी केलेल्या व दुसऱ्या महाविद्यालयात सामावून घेण्यात आलेल्या शिक्षकाला त्याच्या मुळच्या महाविद्यालयात पुन्हा जायचे किंवा सामावून घेतलेल्या महाविद्यालयात रहावयाचे याबाबतचा पर्याय निवडण्याची मुभा त्याला असेल.

.........

**अतिरिक्त शिक्षकाची माहिती प्राचार्यांनी विद्यापीठाला कळविण्यासाठी वापरावयाचे प्रपत्र 'अ'**

महाविद्यालयाचे नाव :

१. शिक्षकाचे नांव :

२. विषय :

३. सदरहू विषयाचा वर्गवार एकूण कार्यभार :
(प्राचार्यांनी निर्धारित केल्याप्रमाणे)

४. संबंधित विषयात कार्यरत शिक्षकांची एकूण संख्या :

५. सेवा जेष्टते प्रमाणे त्यांची नावे व त्यांना दिलेला कार्यभार :

६. सदरहू शिक्षकासाठी उपलब्ध, (असल्यास,) कार्यभार :

दिनांक
प्राचार्यांची सही

उपरोक्त माहिती ही वस्तुस्थितीवर आधारित आहे/नाही. वरील प्रपत्राची प्रत मला मिळाली आहे. मला अतिरिक्त शिक्षक ठरविण्याच्या कोणत्याही बाबीसंबंधी माझी काही तक्रार असल्यास ती १५ दिवसात विद्यापीठाकडे नोंदवावयाची आहे याची मला जाणीव आहे

दिनांक
संबंधित शिक्षकाची स्वाक्षरी

# ALL INDIA FEDERATION OF UNIVERSITY & COLLEGE TEACHERS' ORGANISATIONS

*Extract from the circular No. C-1-97 Dated 27.1.97 issued by* ***Mrinmoy Bhattacharyya,*** *General Secretary, All India Federation of University & College Teachers' Organisations, reporting on the National Executive Committee meeting held at Saurashtra University,* ***Rajkot on 24.1.97***

General Secretary made a detailed report of the last meeting of AIFUCTO secretariat with the UGC pay Revision Committee held on 15.1.97 and also the recommendations of meeting of AIFUCTO Secretariat held after the meeting with the UGC Committee.

Reiterating the points made in the two earlier memoranda the secretariat of **AIFUCTO made a strong plea for inclusion of all Part-time teachers within the perview of the committee in the context of changed employment scenario in Colleges and Universities,** refusal by Universities and State Governments to appoint full time teachers even when such posts fell vacant on retirement or death. Part-time teachers had no security of tenure, received emoluments almost invariably low emoluments and are forced to work under adverse service conditions. They also pleaded for improvement of service conditions of teachers of vocational courses who were nothing better than piece rate workers. The UGC committee agreed to consider both the issues sympathetically. The committee requested AIFUCTO to conduct survey of profiles of existing Part-time teachers and submit the same to the UGC as early as possible. AIFUCTO representatives accepted the suggestion.

At the begining of the meeting a copy of the letter from the UGC to state universities regarding payment of 3rd instalment of interim relief was given to AIFUCTO representatives. AIFUCTO representatives expressed their dissatisfaction over the inordinate delay in submission of their report by the committee. **The chairman of the committee stated that within two months from the date of submission of the report of Fifth Central pay commission, UGC pay committee would submit its report.**

AIFUCTO representatives also demanded that lecturers and Readers be redesignated as Asstt. Professors and associated professors.

*****

**Accepting the recommendations of the secretariat, the NEC decided to organise a March to parliament on 18.3.97.** Participants in the march are requested to assemble in front of the UGC building at 11 a.m. with banners of their respective organisations and posters containing demands both basic and principled demands e.g. against privatisation and commercialisation, enhanced allocation of public fund for higher education etc, and immediate professional demands e.g. **immediate submission of pay committee report and regularisation of Part-time teachers etc.** A sample poster is being mailed along with this circular. You are requested to print your own poster, leaflets etc for this purpose and also hold press conference to give wide publicity to this programme.

*****

Please find enclosed a set of 4 proforma to collect information about Part-time teachers. The three proforma marked I, II and III are for your own use for consolidation and processing of data collected from colleges and / or departments through the unmarked proforma which you are requested to multiply and circulate among your own units. Please do your best to hasten the process. instruct your unit secretaries to act at express speed and send us processed data through proforma I, II and III expeditiously so that we can impress upon the UGC Committee even before they finalise their report. Please treat it as extremely urgent.

Copies of posters and circulars are not being sent to those organisations whose representatives attended the NEC meeting at Rajkot.

*****

On 24-25 January 97 a national seminar was held at Saurashtra University, Rajkot on "Service conditions of college and University teachers with special emphasis on Grievance Redressal Machinery". The seminar was attended among others by Dr. G.D. Sharma, Secretary, UGC and Vice Chancellor and Pro-Vice Chancellor of Saurashtra University. Teacher leaders from 12 states as well as legal experts took part in the seminar. Hon'ble Justice S.C. Mathur delivered the valedictory address. Important papers as well as proceedings of the seminar will be published in the forthcoming issue of T.M.

The seminar covered practically all stages of teachers professional career from recruitment to retirement, identified the short-comings of the present condition and offered several remedial measures.

On the grievance redressal machinery the seminar discussed the 123 rd report of Law Commission of India as also the report of the UGC committee of which General Secretary, AIFUCTO was a member on the same theme. The seminar favoured setting up of a 3-tier education tribunal with numerous suggestions to improve functioning of the tribunals drawing upon experience of functioning of university/ education tribunals in Gujrat, Maharashtra, Karnataka and Kerala. Justice Mathur cautioned against too much reliance on tribunalisation and pointed out pitiable condition of many tribunals at present.

For want of time many issues could not be discussed at full length at the seminar. Consequently the seminar recommended that a small committee consisting of some office bearers of AIFUCTO and some legal experts should be set up by the NEC of AIFUCTO and this committee may draw up comprehensive recommendations covering all aspects of service conditions including grievance redressal machinery.

Expectedly all participants in the seminar emphasized the imperative need to have strong united and democratic teachers organisations which alone could protect teachers interest during their service career and can obviate their need either to go to a tribunal or to go to a formal court of law.

*****

This is a very crucial time for college and University teachers movement. Please do your best to make the 18th March, March to parliament a memorable success.

*****

# ALL INDIA FEDERATION OF UNIVERSITY & COLLEGE TEACHERS' ORGANISATIONS (AIFUCTO)

Calls

# CHALO - DELHI

# 18-03-1997

to demand

1. Release Rastogi Committee Report.
2. Stop privatisation of Education and withdraw Pvt. University Bill.
3. Regularise Part time and Temporary teachers & other demands.

**Assemble at UGC. Bahadurshah Zafar Marg. New Delhi.**

**11.00 A.M.**

**NUTA BULLETIN** (Fortnightly Journal of NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION) **EDITOR :** Prof. A.G.Somvanshi,Shankar Nagar, AMRAVATI-444 606. **PUBLISHER : Prof. V.K. Pande,**7,Yeshwant Appartments Laxmi Nagar,**WARDHA-442 001.** Composed at NUTA Bulletin Office, Phundkar Bhavan, Behind Jain Hostel, Maltekadi Road, Amravati-444 601. **PRINTED AT** Bokey Offset Gandhi Nagar, Amravati. (M.S) **REGD NO**. ATI 83 Licenced to post without prepayment **LICENCE NO. ATI 10**
Name of the Posting office : **R.M.S. Amravati.** Date of Posting : **20- 02 - 1997**

**if Undelivered please return to :**
NUTA Bulletin Office, Phundkar Bhavan,
Behind Jain Hostel, Maltekadi Road, **Amravati-444 601.**